REGISTERED N. No. 5

वर्षाची आगाऊ ६ टपालहशील ०१३
सहामाही " ३ " ०८
साल अखेर " ७ " १ ०८
किरकोळ अंकास ............................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........०१ ०१
दुसरे खेपेस .... .... ....०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Annual in advance 5 Post age 18
Annual in arrears 7 ,, 1 h's 8 a
Six monthly......... 3 ............. - 8
Single copy ................................ 4

Advertisement
Below 10 lines ...... 2 1
Per line over 10 ......4 a
Repetition Per line...8 a

VOL XXXVI AKOLA MONDAY 5 MAY 1902 NO 17

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख ५ माहे मे सन १९०२ इ० अंक १७



## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरीं पेटेंट वाचेस

### नकली मालास भूलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असुन इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्यांना आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉन्ट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं या-हून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवुन तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल. ग्यारंटी देण्यात येतें, व या बद्दलची जोखीम सारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस......................४०
१९ ,, हंटिंग.............................५०

### गोल्ड ५ वर्षाच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग. नकशीचे ...............२५०

### मेटलचें तीन वर्षं ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेंकंद कांट्यासह............१०
१९ ,, मध्यमागी सेकंद काटा असलेलें ................११
१९ ,, हाफ हंटिंगचें.................२०
१९ ,, हंटिंगचें ........................२०
१४ ,, रिस्ट वॉच ......................२०

### इनॅमल्ड मेटल ३ वर्षाच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिग.........................२०
१४ ,, रिस्टवॉच......................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षाच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग..........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यमागीं सेंकंद काटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग .....................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

### सी. हीनीगर आणि कंपनी,

ओरिजिनल निनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.

५ हार्नबी रोड, मुंबई.


---


## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दर शेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.


---

## अगत्याची सूचना

( शेती करण्यासाठीं कंपनी काढण्याबद्दल )

रा. रा. गोविंद भास्कर ओक, सेक्रेटरी डिस्ट्रिक्ट बोर्ड आकोला यांची.

नंबर २

शेअर काढून भांडवल जमवावें. मांडवल साठ हजार रुपयांचें असावें. कंपनीचें कामास जसजशी जरूर पडेल तशा माग-ण्या करून हप्ते वसूल करावे तरी निमे भांडवल वसूल होईपर्यंत प्रत्यक्ष कामास सुरवात करूं नये.

कंपनीचे सर्व खाम्यावर व्यवस्थापक दर-महा १०० शंभर रुपयावर नेमावे; तो डायरेक्टरात शेरीक असावा. कंपनीस शेंक-डा १२ टक्यापेक्षां जास्त नफा पडला म्हणजे ह्या प्रमाणें नफा वाटण्यास जी रकम लागेल ती वजा जाऊन बाकी नफ्याची रकम राहील तिचा शेंकडा पांच व्यवस्थाप-कास द्यावा. त्यांचे हाताखालीं चार मदतगार चौघा मिळून दरमहा शंभर रुपयावर द्यावे. ह्यास व कंपनीच्या सर्व नोकरास लागणाऱ्या व तसेंच जनावरास व माल ठेवण्यास लागणाऱ्या तूर्त कच्च्या इमारती कराव्या.

बैलाच्या जोड्या आणि देशी शेतकामाचीं औतें हीं विकत घ्यावीं.

व्याजाच्या रुपानें भागीदारांस त्यांच्या भांडवलाचा $\frac{१}{४}$ हिस्सा त्यांच्या घरांत गेल्या खेरीज परदेशीय तऱ्हेनें शेतकी करण्यास किंवा परदेशीय यंत्रें आणण्यास डायरेक्ट-रास सक्त मनाई असावी.

कंपनीचे कांहीं नोकर सालाच्या करारानें असावेत. हंगामाच्या दिवसांत महिन्याचे करारानें पाहिजे तितके जास्त नेमावे. शेती-च्या जागीं लभाणे, बंजारे, आंध, नाइकडे हे नोकर मिळतात. त्या खेरीज देमाळ (सोलापुरी) मावळे (पुणे जिल्ह्यातील घाट माथ्यावरील शेतकरी) कोंकणे (कोकणांतील शेतकरी), वगैरे लोक नोकरी-स ठेवावे म्हणजे कट होणार नाहीं. मावळे आणि कोंकणे चांगले काम करणारे असतात. ते जितकें काम करतील तितकें काम इकडी-ल मजुरास करण्यास भाग पाडतां येईल. नोकरांपैकीं जे जीव लावून काम करणारे असतील त्यांस रुपया आठ आणे जास्त पगार करून मुकदम करावे; पण त्यांनींही स्वतः काम करून आपले हाताखालील गॅंग (टोळी) मधील मनुष्याकडूनही काम करून घेतलें पाहिजे. साल्दार मजुरा-कडून करारनामा घेतला पाहिजे कीं, नोकरी सोडण्यापूर्वीं दोन महिने आगाऊ कळवीन.

नांगर वखर वगैरे जेवढीं हत्यारें रोज कामांत असतील त्याच्या चौपट हत्यारें नेहमीं निरनिराळे जागीं तयार ठेविलीं अस-लीं पाहिजेत. म्हणजे मोड तोड झाल्यास त्याची दुरुस्ती होईपर्यंत जनवराचे व मनु-ष्याचे कामाची खोटी होते, ती होणार ना-हीं. जरूर पडतील तितक्या गाड्या तयार कराव्या. ह्या सर्व कारखान्यांस सुतार व लोहार ह्यांची नेहमीचीच जरूर लागेल म्हणून त्यास महिन्यांनीं नोकरीस ठेवावें.

कच्चीं घरें करण्यास फारसा खर्च येणार नाहीं. वहीत करण्यास काढले जाणारे नंबरातील उत्तम इमारती लांकडें निघतील तीं इमारती करिता ठेवावीं व इतर किरकोळ लांकडाचीं छपरें करावीं तीं २।३ वर्षें पर्यंत काम देतील. पुढें कवलें आणि विटा ह्या घरगत तयार करून पक्कीं घरें बांधावीं. जनावरांस व शेळ्या मेंढ्याचे कळपास पावसाळ्या करिता व हिंवाळ्या करिता निवाऱ्याची जागा पाहिजे. असा अनुभव आहे कीं ह्या निवाऱ्याच्या जागा करण्याचे हयगइमुळें वारा व पावसाची झड अगर फार थंडी पडू लागली असतां हीं जनावरें कांकडून मरतात.

नंबरातील झाडें तोडून तीं ज्या बाजूस सरकारी जंगल आहे तिकडे होईल तेथवर टाकावीं. म्हणजे जंगलीं जनावरें वहीतांत येण्यास आडकाठी होईल. तिकडे मळाऊ लांकडें फार असतात. यांचा जाळ राखी वहिताचे बाजूनें करितात; या मुळें जनावरें भितात. हत्याराचे परवाने पिकाच्या रक्षणा करितां मिळविले पाहिजेत.

कांट्याचे तारेचें (borbed wire fencing) कुंपण केलें तर त्या पासून जंगली जनावरा-चा बचाव होतो. हल्लीं किनवट फारेष्टाचे परोटी ह्या गावीं फारेष्ट खात्यामार्फत या काटेरी तारेचें कुंपण केलेलें आहे; ह्यापासून पुष्कळ बचाव झाला आहे असें तिकडील लोक सांगत आहेत.

इतर धंद्यात ज्याप्रमाणें यंत्र सामुग्री बेरज भांडवल गुंतवावें लागतें; तसें ह्या धंद्यांत होणार नाहीं. इतर धंद्यांतील माल-मत्तेची (यंत्रें वगैरे) किंमत, वापरण्यानें किंवा त्यांत नवीन सुधारणा झाल्यानें सालोसाल कमी होत जाते. तसें ह्यांत नाहीं जमीन वहीत होईल तशी तिची किंमत वाढत जाईल. कंपनी मोडण्याचा प्रसंग आल्यास वहितीस आणलेली जमीन फुटकळ विकली तरी तिचें भांडवल परत येईल.

त्या भागात मारवाडी वगैरे अद्याप फार-से नाहींत; म्हणून आपले कंपनीनें तिकडे उत्पन्न होणारे जिन्नस खरेदी करावे आणि कपडा किराणा वगैरे तिकडे नेऊन विका-वा ह्यामुळें पुष्कळ फायदा होईल आणि आमचे नोकर लोकांस कपडा किराणा वगैरे विकत घेण्यास सोईचें पडेल.

जो म्यानेजर नेमण्याचा त्यास शेतीच्या ज्ञानाची, वैद्यकीय ज्ञानाची आणि गुराच्या रोगावरील उपायांची चाल चलाऊ माहिती असली पाहिजे. तो उद्योगी, मेहनती व कर्तव्यदक्ष असा असून प्रामाणिक पाहिजे. कंपनीचें हित ज्यांत आहे असे व्यवहार करण्यास त्यास पूर्ण मोकळीक असली पाहिजे. त्याचे कामाची चाचणी पहाणें करि-तां दर तिमाहीस कोणी डायरेक्टर गेला पाहिजे.

अशा तऱ्हेची कंपनी काढून शेती करावी असा विचार मनात फार दिवसापासून आहे. पण ह्या विचारास पूर्णता येण्यास मुंबई

इलाख्यांत "धि इंडियन लँड कंपनी" ह्या नांवाची ९ लाख रुपये भांडवलाची नोंदलेली कंपनी निघाली, हें आहे. ह्या कंपनीच्या पांच लाख रुपये भांडवला पैकीं ३,२७००० रुपयें जमिनीच्या किंमतीबद्दल त्या कंपनीस द्यावे लागत आहेत ह्मणजे इतकें भांडवल गुंतून पडत आहे. पण वर लिहिले प्रमाणें पडीत जमीन घेऊन वहितीस आणिली तर वहीत करण्यास लागेल तेवढाच खर्च. जमिनीची किंमत ह्मणून कांहीं द्यावी लागणार नाहीं, ह्यामुळें नफ्याचें प्रमाण इकडे चांगलें राहील.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य १२ शके १८२४

---

## सत्समागम

श्रीमान् स्वामी हंसस्वरूप यांची स्वारी आकोल्यास गेल्या शनिवार पर्यंत होती. येथून ते बाळापुराकडे रवाना झाले आहेत. यांच्या सुसंस्कृत वाणीनें व वक्तृत्वानें हिंदी भाषा लोकांस फार गोड व मनोहर वाटूं लागली आहे. कै० पंडित दयानंद सरस्वती यांनीं स्थापिलेल्या आर्यसमाजाचे एक उपदेशक पंडित इंद्रदत्तशर्मा हे येथें येऊन त्यांनीं स्वामी महाराजांबरोबर मूर्तिपूजाखंडना संबंधानें वादविवाद केला. पण हा वाद करणारे गृहस्थ चतुर व वादकुशल नव्हते आणि स्वामी पुढें ते, जशी सिंहापुढें शेळी तसे दिसत होते. परस्परांनीं वेदामधील मूर्तिपूजेला अनुकूळ प्रतिकूळ आधार दिले परंतु पुढील वाद उभय वादीप्रतवादी यांच्या असाम्यतेमुळें तसाच बंद राहिला. दुसरें दिवशीं स्वामींनीं प्रतिमापूजनाची गोष्ट सामान्य लोकांस आवश्यक आहे असें सांगून साकार स्वरूपा प्रमाणेंच निराकार स्वरूपाचा दुसरा सोपान परमेश्वरापाशीं कसा नेतो याची स्पष्टता करून दाखविली.

स्वामींनीं आकोल्यास ब्रह्मविद्येचा वर्ग काढला आहे. त्यांतील छात्रमंडळीस हस्तन्यास, योगाचें आसन, प्राणायाम इत्यादि योगमार्गाचीं साधनें समजून सांगितलीं. एकंदरीनें आकोल्यास दीडशें दोनशें शिष्य मंडळी जमली आहेत. स्वामी महाराज फार गुणी आहेत. त्यांच्या सत्समागमानें आकोल्यास सनातन हिंदु धर्माविषयीं लोकांच्या मनांत आदरभाव व श्रद्धा हीं उत्पन्न झालीं आहेत ही आनंदाची गोष्ट होय.

हिंदु धर्म सनातन आहे व त्याचीं तत्वें उच्च, उदार आणि फार व्यापक आहेत. ह्या धर्मावर कोणीही कितीहि शस्त्रें धरलीं व त्याचा बीमोड करण्याची कशीहि हांव व महत्वाकांक्षा घेतली तरी ते प्रयत्न सर्व निष्फळ होऊन उलटा हिंदुधर्माचा अखंड वृक्ष त्रिकालहि स्वर्गा पर्यंत जोरानें वाढत जाईल. आपल्या अज्ञानानें त्याचें महत्व आपणांस कळत नाहीं पण एकवार ज्ञानांजन डोळ्यांत झोंबलें कीं सर्व भ्रम दूर होईल. ब्रह्मज्ञानाची प्राप्ती करून घेणें हेंच मनुष्य प्राण्याचें आद्य कर्तव्य होय. इतर विद्या जशा आपण महा परिश्रम करून साध्य करतो तद्वत् या विद्येसाठींहि मुळापासून शिकलें पाहिजे. ह्या विद्येचीं धुळाक्षरें संध्या, अहिंसा, सत्य, धृति आदि करून २६ आहेत. त्यांचें परिशीलन केलें पाहिजे. ही गोष्ट एका जन्मांत न झाली तर दहा पांच जन्मांनीं तरी साध्य होईल. मात्र आपलें ज्ञान अभ्यासानें दृढ करीत गेलें पाहिजे, एकदा अंगांत बाणलेला संस्कार नाहींसा होत नाहीं पण आपण पूर्वसंचित ज्ञानांत भर घातली पाहिजे. या गोष्टींत एक वार आपल्या मनाचा संकल्प झाला ह्मणजे तो दृढावत जाऊन आपली इष्ट वस्तु आपणांस प्राप्त होईल.

ह्या पाखांड व भ्रष्ट काळामध्यें सद्धर्माची उन्नती हाच एक तरणोपाय आहे. धर्मोन्नतीच्या सागरतीर्थामध्यें इतर राष्ट्रोन्नतीच्या महा नद्या अंतर्भूत होतात. ह्या एका तीर्थप्राशनानें सर्व पुण्यफलाची प्राप्ती होणारी आहे. धर्माची एकटी लाट सर्व जगताचें अंतःकरण तद्रूप करून सोडण्यास समर्थ आहे. धर्मावर वारंवार व्याख्यानें देऊन लोकांची चलित झालेली बुद्धि ताळ्यावर आणण्यासाठीं स्वामी महाराजासारखे महात्मे अनेक निर्माण झाले पाहिजेत, आणि असें झाल्याखेरीज म्लान होत चाललेला धर्म पुन्हां उर्जित दशेस येऊन ऱ्हासास लागलेलें राष्ट्र पुन्हां सावरणार नाहीं.

---

## प्रांतिक प्रश्न

वऱ्हाड प्रांता संबंधानें सध्यां मोठाच वाद पडला आहे. या वादामध्यें न्यायाच्याच गोष्टी होतील असा आह्मांस भरंवसा वाटत नाहीं. ज्याची वस्तु त्याला परत द्यावी यांत कांहीं मोठासा सात्विकपणा आहे असें नाहीं. पण हल्लीं सद्गुणाचा विशेष लोप होत चालल्यामुळें सामान्य निर्दोष वर्तनाला देखील सद्गुणांची थोरवी मिळते. अमानत वस्तु परत केली तर त्यांत मोठें पुण्य आहे असें नाहीं पण तोच जर विश्वासाचा ठेवा बुडविला तर मात्र महत्पाप घडतें. या महापापाला देखील कारस्थान व मुत्सद्दीपणा अशीं मोठीं नांवें राजकीय प्रकरणांत मिळतात. वऱ्हाड प्रांत अमानी मुलूख आहे तेव्हां तो परत निजाम सरकारच्या स्वाधीन करावा यांत सरकारचा मोठा भलेपणा आहे. परंतु ही गोष्ट सरकारी राज्यकर्तृत्वाला शोभणारी नाहीं! राजनीतीचीं तत्वें लोकनीतीहून निराळींच दिसतात. पायोनिअरचा बातमीदार लिहितो कीं या प्रकरणांत खरा न्याय होण्याचा संभव नाहीं. कै. ग्लाडस्टन साहेबांनीं आयोनिअन बेटा संबंधानें जी उदार राजनीती चालून दिली तिचें अनुकरण या पुढें होईल असा आशातंतू देखील नाहीं.

राज्याची तृष्णा मोठी दुर्घट आहे. तिच्या पायीं सर्व पापें घडतात. प्रामाणिकपणा राष्ट्राची उन्नती करितो ही गोष्ट कागदावर सोनेरी अक्षरांनीं लिहावी पण कृतींत तिची पायमल्ली करावी असा गेल्या दोन शतकांचा राजकीय धर्म दिसतो. आज पन्नास वर्षें ज्या प्रांताचा उपभोग घेतला तो प्रांत न्यायदृष्टीनें कोणाचाही असला तरी तो आमच्या सरकाराला मोहांत पाडीत आहे. अर्ध्या शतकाच्या वहिवाटीनें सरकारास या प्रांताविषयीं आपलेपणा वाटूं लागला आहे. सुखसमृद्धी देणारा प्रांत हातचा सोडवत नाहीं. राजकीय धोरण असें सांगतें कीं सर्व इंडियाचा असा सुवर्णमय मध्यवर्ती प्रांत हातचा जाऊं द्यावयाचा नाहीं.

माणसाची जी कथा तीच राष्ट्राची होय. एक वेळ बरा वाईट निश्चय ठरला ह्मणजे त्याच्या मंडनाकडे सर्वशः प्रवृत्ति होते. मोठ्याशा नीतितत्वाच्या आड लपण्यास संधी मिळेल तर मनुष्य धुंडाळीत असतो. वऱ्हाडच्या प्रश्नाविषयीं वाटाघाट चालूं झाली तेव्हां नीतीचा मुलामा सरकार कसा देऊं लागलें हें पाहण्याची मोठी गम्मत आहे. चक्रवर्ती सरकारची गोष्ट कांहीं निराळीच असते. युक्तिवाद मोठा चमत्कारिक खरा! माशानें माणिक गिळिलें तर तें परत मिळत नाहीं. सिंहानें न्यायाचा तराजूं हातीं घेतला तेव्हां सर्वच हाविर्भाग त्याच्याच दाढणींत गेला. तद्वत् सरकारच्या युक्तिवादानें वऱ्हाड प्रांत त्यांच्याच आमलांत कायमपणें राहावा असें ठरत आहे.

निजाम सरकार ह्मणतात कीं, ज्या मागील कर्जासाठीं हा प्रांत वहिवाटीला दिला तें कर्ज फिटलें आहे, आणि ज्या लष्करी खर्चासाठीं या प्रांताचा वसूल तोडून दिला तें लष्कर जर आतां नको तर हा प्रांत आमचा आह्मांला परत करावा. ही गोष्ट अगदीं काना पलीकडे टाकून अलिशान रेसिडेंट साहेब हलेंकच ह्मणतात कीं, हा प्रांत ब्रिटिश सरकाराकडे कौलपट्यानें असला तर किती नामी गोष्ट होणारी आहे पहा! ब्रिटिश सरकार कौलदार ह्मणजे होत आहे ही गोष्ट धनको निजाम सरकारास मोठेपणाची आहे. निजाम सरकारच्या पदरीं खुद्द चक्रवर्ती सरकार पट्टेदार बनणार आहे हा लाभ अपूर्वतेचा आहे. धातुपात्राबरोबर मृत्तिकेच्या पात्रानें स्नेह केला पण पुढें एकदां कांहीं कारणानें कलह लागला तर मृत्तिकापात्र नामशेष होतें अशी एक जुनी गोष्ट आहे. तिची आठवण या राजकीय कौलपट्याच्या प्रकरणांत विशेष होते. असा अपूर्व संबंध चिरकालच्या कौलपट्यानें जुळला तर त्यापासून निजाम सरकारला मोठी द्रव्यप्राप्तीही होणार आहे असें अलिशान रेसिडेंट साहेब प्रतिपादन करितात. स्वामित्व निजाम सरकाराकडे कागदोपत्रीं पूर्ववत् चालणार असून त्याच्या शिवाय त्यांच्या खजिन्यांत दरसाल २९ लक्ष रुपये अविच्छिन्न येत जातील. हल्लीं राज्यकारभाराचा खर्चवेंच वजा जातां निजाम सरकारास सरासरीनें ९॥ लक्षच रुपये दरसाल मिळतात. या रकमे पेक्षां २९ लक्ष रुपयांची रक्कम किती तरी मोठी आहे! ही द्रव्यप्राप्तीची गोष्ट किती मोहकपणानें मांडण्यांत आली आहे याचा विचार वाचकांनींच करावा. सध्यांच्या राज्यकारभारांत निजाम सरकाराकडे ब्रिटिश सरकाराचें साडेतीन कोट रुपये कर्ज आहे आणि हें कर्ज देखील ब्रिटिश सरकार सोयीसोयीनें ह्मणजे पंधरावीस वर्षांत फेडून घेण्यास तयार आहे. आणि ही कर्जाची फेड चालूं असतांना देखील कौलपट्याच्या २९ लक्ष रुपयांपैकीं कर्जाकडे तीन हिस्से रक्कम वळती घेऊन बाकीची सहा साडे सहा लक्ष रुपये निजाम सरकारास सालिना देण्यांत येतील. हा ब्रिटिश सरकारचा सावकारी दयाळूपणा होय. कौलपट्या पासून निजामचा मोठा गौरव होईल, त्यापासून द्रव्यप्राप्तीही मोठी होईल आणि चालूं कर्जाची फेड आपोआप होऊन दरसालचा निवंत वाढता झरा खजिन्याला मिळत जाईल. या त्रिदल लाभकमलाचा अर्पणविधि ब्रिटिश सरकार करणार आहे आणि या श्रीमंती पूजेचा स्वीकार करण्या विषयीं चक्रवर्ती सरकारचा मांडलीक सरकारला अत्याग्रह दिसत आहे.

निजाम सरकारांनीं कोणत्याच गोष्टीला होकार भरला नाहीं पण श्रीमंत प्रभूची कमलपूजा शिरसावंद्य करावी लागेल असें लोक बोलतात आणि ही गोष्ट थोड्याबहुत फेरफारानें अशीच घडून येण्या सारखी आहे. कौलपट्याचा व्यवहार निश्चित करण्यांत आला तरी देखील 'पायोनिअर' पत्राच्या निजामशाही लेखकानें स्वामित्वाची रक्षण किती व कशी ठरवावी या संबंधानें उपयुक्त माहिती दिली आहे. कै. सर सालरजंग यांच्या मागें मि० ग्रिबल साहेबांनीं वऱ्हाडचा प्रश्न मोठ्या नेटाचा धरला आहे. आणि तेच बहुत करून पायोनिअरचे बातमीदार असावेत. कौलपट्याच्या स्वामित्वाची रक्कम २९ लक्ष रुपये ह्मणजे फार कमी आहे. व ही रक्कम किती वाढवावी हें ठरविण्याला मुख्य साधनें सरकारी रिपोर्टांतच आहेत.

---

## उपानहाचा उपमर्द.

अलिकडे उपानहा संबंधानें फार वाईट गोष्टी ऐकूं येतात. थोड्या दिवसापूर्वीं बंगाल-नागपूर रेल्वेच्या सुपरिंटेंडंटानें खडकपूर येथें एका महाराष्ट्रीय ब्राह्मणाचा छळ केला. त्याचा अपराध इतकाच कीं त्यानें पायांतला जोडा काढला नाहीं. त्यामुळें साहेबांचा मोठा उपमर्द झाला ह्मणून साहेबांनीं आपला हात यथेष्ट चालविला. पादत्राणाच्या संबंधानें बूट किंवा जोडा सारखाच आहे. आमच्या देशांतील हवापाण्यासंबंधानें जोडा फक्त रस्त्यावर चालतांना लागतो. घरीं, दरबारांत किंवा बसण्या उठण्याच्या ठिकाणीं आमचे लोक जोडा काढून ठेवितात. विलायतच्या हवामाना प्रमाणें तिकडच्या थंड हवेंत बूट पादत्राणा साठीं अक्षयीं पायांतच ठेवाव लागतात. पण हा बुटाचा नियम इंडियांत पाळण्याचें प्रयोजन नाहीं तथापि जबरदस्तीनें सत्तेच्या जोरावर बूट कोठेंही व कसाही चालतो. इतकेंच नाहीं तर अलिकडे दरबारच्या व कचेरीच्या बैठकींत देखील बुटाच्या सोयीची टेबलें व खुर्च्यां वगैरेंची मांडणावळ असते. पायांत जोडा असला व तो बुटा प्रमाणें चालविला तर मात्र आमच्या इंग्लिश लोकां पैकीं कांहीं लोकांस कालिवाद

खपत नाहीं. ती गोष्ट त्यास अगदीं अक्षम्य वाटते आणि शिक्षा करितांना ते माणसकी काही विसरतात. 'इंग्लिशमन' पत्रकर्ता ह्मणतो कीं देशी चाली रिवाजा प्रमाणे जोडा कोणी काढला नाहीं तर त्या उमर्दा बद्दल पारिपत्य करण्याचा अधिकार प्रत्येक साहेबाला पोचतो. ह्या कोटिक्रमावर आमचें उत्तर इतकेंच आहे कीं, जोडा सदैव पायांतच ठेवावा आणि अशा पारिपत्याच्या वेळींच तो पायांतून प्रयुत्तरा दाखल काढींत जावा. या जोड्या संबंधानें वारंवार कटकटी होतात. देशी रिवाज जोडा काढण्याचा आहे तो आह्मांस कबूल आहे. पण त्या बरोबरच दुसरा देशी रिवाज असा आहे कीं, ब्राह्मणेतर लोकांनीं ब्राह्मणाच्या पायावर डोकें ठेवावें व त्यांचा आशीर्वाद घ्यावा. हा रिवाज साहेब लोकांनीं कां पाळूं नये याचें कारण कोणी आंग्लो-इंडियन सांगेल तर बरें होईल. आमच्या प्रांतांत या जोड्याच्या प्रकरणांत चांगल्या चांगल्या गृहस्थांना अपमान सोसावा लागला आहे. चाकरीच्या साठीं दांतीं तृण धरून अरेरावीपणाला शरणांगत पुष्कळजण गेले आहेत. आह्मी ह्मणतों कीं, या संबंधानें सरकार मार्फत एक वेळ कायमचा निकाल लागला पाहिजे. आमच्या उपानहाचा असा उपमर्द होता कामा नये. त्यांची व बुटांची पायरी एकच आहे. लार्ड कर्झन साहेब देवालय पाहण्यास गेले तर पायांतला बूट काढतात, तसा जेथें बूट चालणार नाहीं तथें आमचा जोडाही चालूं नये. आह्मी त्या गोष्टीस कबूल आहों. परंतु जेथें बूट जातो तेथें जोडा जाण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. एक वेळ जोड्याचा प्रश्न सरकारी ठरावानें निकालास लावण्या साठीं राष्ट्रीय सभेनें हा प्रश्न हातीं घेतला पाहिजे. सारांश, बुटाचा व जोड्याचा मानपान सारखाच पाहिजे. जेथें जोडा चालत नाहीं तेथें बूट कालत्रयीं चालणार नाहीं जेथें आह्मी जोडा काढावा असें साहेब लोक ह्मणतात त्या कचेरी दरबाराचा महिमा राखण्यासाठीं बुटाला देखील मज्जाव पाहिजे. जर बूट सरसकट उभा चालतो तर जोडा तसाच सारखा चालला पाहिजे.

# The Berar Samachar

MONDAY MAY 5 1902

There is a great money—lending agency in Berar. The number of money—lenders is a large one though 99 per cent. of them are capitalists of petty means. The total capital that is let out at interest will not come to a large figure but there are petty money—lenders who live upon the weaknesses of petty borrowers. The rates of interest are very prohibitive in character. People in need are accustomed to promise heavy rates of interests and never look to the woeful effects of inprudent agreements when they are gratified for the moment of the present need. The difficulty of the present hour is too much before their eyes & it minimizes the wearisome and ruinous risks into which they once launch with many people make wrong calculations about their prospective revenues from agriculture. A wild speculation springs up from such habits of no forethought and the people create new wants and run into debts to satisfy them. This is the reason why we can count amongst the agriculturists the major portion of the borrowing clientage of the money—lenders. The results of long borrowings have been disasterous to the stability of families. The general credit has gone down below the normal standard and the new influx of a number of calculating and pettyfogging Sawakars has out-grown the money—lending agency of Berar. There is at present a war between the needy people on the one side and the the money—lending agency on the other. The competition is very keen when through ignorance and want of prudence of the needy the money-lenders win all the counts in the race. The struggle has been for over 30 years and the procedure of law—courts has helped the money—lenders to deprive the poor people of their dearest stakes in life. Pauperism has been the rule amongst the people who are not above want; where as concentration of wealth has been progressive and has brought renewed strength and power to the rising class of money—lenders. The business of usury has been the sole cause of ruin in this province and has got a full play at present. It will continue to prosper until the estates of the sinking people have been completely transferred into the hands of the new class of middlemen that draw all lotteries of the day in their favour. Such is then the sharp line that distinguishes the majority of the people from the little band of their money—lenders. We condemn the present business of usury because it does not bring prosperity to the constituents of money—lenders as well as it does to the latter class. Poverty is increasing at a rapid stride amongst the masses; and we wish to point to the greatest danger of this automatic downfall of our agriculturists.

The Government of India have in view a great programme of improving the agricultural credit of Berar. The report on 'co-operative credit societies' is already before the public. The Government wish to stand rather as third parties in the business. They want to do a friend's duty towards both the divisions of the people viz, the money-lending agency and the borrowing people. They promise to assist the agricultural banks with funds to remove the rigour of law in regard to the realization of debts, to minimize the stamp duties and to afford extra provisional remedies for a prompt and prior realization of debts. The intentions of the Governments are excellent and we presume that they may bear a golden fruit in other provinces.

But in regard to Berar, we notice a deplorable state of facts. It is not true that the agriculturists want special concessions for their loans. The generality of the people lives on agriculture. In plain words, large number of them are daily labourers in the fields. They have left with them no great estate for future borrowings. The transfer of properties has been wonderfully rapid and we do not see any necessity for specializing the grievances of agriculturists as class. The grie-

and it is necessary that legislation should step in to control the rates of interest and it is then that village banks will prosper well and prove to be of some use to the people. What the Government intend to do by way of help to the village banks is at first required in the interest of the people. We do not so much require the proposed banks as we require most urgently the benifits of the remissions of stamp—duties, the regulation of the rates of interest and the reduction of the expenses of court—suits.

## वऱ्हाड

हवामान—दिवसा उष्मा फार होतो. रात्री थंडपणा नऊ दहा वाजल्या नंतर वाटूं लागतो. हवा रूक्ष व निरोगी आहे ङगाचा रोगही सध्यां शांत आहे.

कुमार श्री हरभामजी राज्याजी हे १ ले तारखे पासून एक महिन्याच्या हक्काच्या रजेवर गेले. व गल्या शुक्रवारीं काठेवाडाकडे जाण्यासाठीं येथून रवाना झाले.

रा. रा. बंधूजी जनार्दन, सिव्हिल जज्ज, उमरावती याचे चिरंजीव जे नुकतेच बी. ए. एल. एल. बी. झाले आहेत त्यास मंगरूळपीर येथें तहशिलदारी देण्यांत आली वडिलाच्या उत्कृष्ठ चाकरी बद्दल हा योग्य मोबदला सत्पात्रीं सरकारांतून देण्यांत आला ही आनंदाची गोष्ट होय.

रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे हे येथें एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर होऊन मि० करी साहेबांच्या जागीं रुजूं झाले.

आणि त्याच्या जागीं मंगरूळचे तहशिलदार मि० शेख मुनीर यांस बाळापुरास नेमण्यांत आले.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं, रा. रा. पुरुषोत्तम गणेश केळकर, यांस पुणें मुकामीं गेल्या महिन्यांत देवाज्ञा झाली. यांस पेनशन घेऊन दोन वर्षे होत आलीं इतक्यांतच यांचा अंत झाला! हे वाशिमास हेड मास्तर असतांना यांनीं पेनशन घेतलें. हे स्वभावानें फार प्रेमळ, मनानें मोठे आणि वर्तनानें अगदीं साधे असे गृहस्थ होते यांच्या मरणानें त्यांच्या आप्तमित्रास व छात्रसमूहास फार दुःख होईल! ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

मि० सिलीमखान दाऊदखान साहू यांस गेल्या २९ वे तारखेस देवाज्ञा झाली हें कळवितांना मोठें दुःख वाटतें. राजश्री सिलीमखान यांस अर्धांग वायूची विकृती होऊन त्याचा स्वल्प काळांतच देहान्त झाला. यांची उमर ७० वर्षांपेक्षां अधिक होती हे हिंदु मुसलमानांत सारखे मिळून मिसळून प्रेमभावानें वागत असत, गृहस्थ मोठा उमदा होऊन गेला. हे सार्वजनिक संस्थामध्यें पुढारी असत. यांची दुकानदारी मोठी आहे आणि यांचे चिरंजीव वडिलांचा लौकिक कायम ठेवण्यासारखे कार्यदक्ष आहेत हें दुःखांत सुख होय!

## NOTICE

Applications are hereby invited

Municipality as a temporary measure for two years on a pay of about Rs. 50 including allowances. Persons having a thorough knowledge of public works, draining, surveying, measuring and levelling &c. should apply with testimonials.

Dated Akola 8-5-02 | V. M. Mahajani Vice Chairman M. Committee Akola.

## नोटीस

वेशमी रामराव व्यंकटेश मुनशी वस्ती आकोला. यांस.:—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे मालकीचे मौजे सिवणी येथील सर्वे नंबर ३३।२९ हीं दोन्ही शेतें तारीख १९ माहे एप्रिल सन १९०२ इसवी रोजीं तुह्मी आमचे पासून रुपये पाच शेला विकत घेण्याचे तोंडी ठरवून त्यांचे साऱ्याबद्दल रकम रुपये १०० शंभर नगदी देऊन तुमचे वडिलाचे नांवची तुह्मी पावती घेतली आणि सर्वे नंबर ३३ चा राजीनामा कबुलायत व सर्वे नंबर २९ चे खरेदीखत आठ बारा दिवसांत करून घेऊं त्या वळेस बाकीचे रुपये ४०० व त्यास लागेल तो खर्च देऊं. असें ह्मटलें. त्या प्रमाणें तुह्मी ता. २९।४।०२ रोजीं आमचे पासून सर्वे नंबर ३३ चा राजीनामा लिहून घेऊन विद्यमान आकोला तहशिलदार साहेब यांचेकडेस दाखल केली व त्याच दिवशीं सर्वे नंबर २९ चे खरिदीखत गोविंद व्यंकटेश अज्ञान पालन करणार व्यंकटेश कृष्ण मुनसी यांचे नावानें लिहून घेऊन विद्यमान सबरजिष्ट्रार समोर दाखल करावे ते वेळीं तुह्मी सांगितलें कीं आज रुपयाची तजवीज होत नाहीं, उदईक करून देऊं. या प्रमाणें तुह्मी आम पावेतो येऊन ते खरिदीखत नोंदून घेतले नाहीं व आह्मी त्याजबद्दल तुह्मास दोन तीन वेळां ह्मटले असतांही तुह्मी दुर्लक्ष्य केलें. करितां मुद्दाम या नोटिशीनें कळविण्यात येते कीं सदरहू शेताबद्दलचे राहिलेले रुपये ४०० चारसे नोटीस पावले तारखे पासून ४ चार दिवसाचे आंत आह्मांस देऊन आमची पावती घ्यावी व वरील मुदतीचे दरम्यान खाते नांवें लावून देण्याप व खरेदीखत नोंदुन देण्यास आह्मी तयार आहोत तसें न केल्यास झालेला व्यवहार रद्द समजून तुह्मी दिलेले रुपये १०० शंभर आह्मी नुकसानी बद्दल जमा करून घेऊ व सदरहू शेताची विक्री दुसऱ्या करूं ते कमीजास्त झाले तर त्याजबद्दल तुमची पुढें कोणते प्रकारची तकरार ऐकली जाणार नाहीं. ही नोटीस दिली, कळावें ता. ४।५।०२ इ०

सही

बच्चुलाल गोंदुलाल तर्फे मुखत्यार

भगवंत सखाराम मुखत्यार

दस्तुर खुद.

मुंबई इलाख्यांतील हाडें— मुंबई इलाख्यांतून खंडागणती हाडें परदेशी दरसाल जात असतात. त्यांचा उपयोग खताकडे होतो. या हाडांतील शेकडा ६६ खंडी माल इंग्लंडांत, २७ जर्मनींत व बाकीचा बेलजम व फ्रान्समध्यें जातो, मागच्या पांच वर्षांच्या आंकडे पुढें दिले आहेत.:—

| साल | टन. |
|---|---|
| १८९६–९७ .... .... | ६१.२९७ |
| ,, ९७–९८ .... .... | २१,४४७ |
| ,, ९८–९९ .... .... | २७,९०१ |
| ,, ९९–१९००.... .... | ४८,८४६ |
| १९००–१९०१.... .... | ६६,२६३ |

सांगलीच्या धाकट्या वहिनीसाहेब ६ महिन्याच्या गरोदर आहेत त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठीं २५० रु. दरमहाच्या दोन दाया ठेवण्यांत आल्या आहेत. नवा इंग्रजी प्रकार.

मदुरा जिल्ह्यांत मरवा नांवाच्या लोकांनीं एका खेडगांवांतील जमीनदारास व त्याच्या नोकरांस अन्नपाण्यावाचून कोंडून ठेविलें होतें त्यांस सोडविण्यासाठीं त्या जिल्ह्याचे असिस्टंट कलेक्टर, व पोलिस सुपरिटेंडंट गेले होते. त्यांच्याशीहि यांनीं मारामारी केली. जमीनदारास सोडविलें तेव्हां ते मरणोन्मुख झालें होते. सध्यां गुन्हेगार फरारी झाले आहेत,

## जाहिरात.

सर्व लोकांस या लेखानें जाहीर केलें जातें कीं, मी आपल्या तीन मुलास ह्मणजे श्री किसन २ राधाकिसन ३ जयकिसन या त्रिवर्गास आपल्या जिंदगी पैकीं निमे जिनगी उपभोगासाठीं माझी मालकी कायम ठेऊन सारखी वाटून दिली आहे. जिनगी देते वेळीं करार असा केला आहे कीं कोणीहि माझ्या लेखी संमती खेरीज आपली स्थावर व जंगम इस्टेट गहाण, विक्री, अगर बक्षीस वगैरे कोणास देऊं नये व त्यास मालकीच्या नात्यानें तशी देताही येणार नाहीं. तसेंच इस्टेटीवर कोणा पासून कर्जहि काढूं नये. असें असता माझा मुलगा राधाकिसन हा सावकाराकडून कर्ज घेऊन कांहीं जमीन गहाण अगर विक्री करण्याच्या विचारांत आहे, ह्मणून असें जाहिर करण्यांत येतें कीं ह्यांस कोणी कर्ज देऊं नये आणि त्याला दिलेल्या इस्टेटीशी कसलाहि व्यवहार करूं नये. कोणी केल्यास त्याबद्दलची जोखीमदारी ज्याची त्याजवर राहील. कोणत्याही मुलांच्या ह्मणजे माझ्या इस्टेटीस बांधूं शकणार नाहीं. कळावें ता. २९ एप्रील १९०२ इसवी.

सही.

शालिग्रामजी दमानी मारवाडी

दस्तुर श्रीकिसन शालिग्रामजी

राहणार निमगांव तालुके

मलकापूर.

दिवाणी दावा नंबर २ क्लास १८

१९०२

मालमत्तेचे संरक्षण करण्याचा कायदा अक्ट नंबर ८ सन १८९० यांतील कलम ११ अन्वयें नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर सिव्हील जड्ज आकोला यांचे कोर्टांत.

बाळ्या वल्लद मोतीसिंग रजपूत वस्ती दानापूर ता० आकोट अज्ञान.

अर्जे अज्ञानाचें पालन करण्याबद्दल अगर त्याचें मालमत्तेचें संरक्षण करण्याबद्दल विष्णु प्रभुराम सोनार पेनशनर पि. रा. आकोला अर्जदार याने असा अर्ज दिला आहे कीं, मला अज्ञानाचें पालन करण्याचे अगर त्याचे मौजे दानापूर तालुके आकोट येथील सर्व्हे नंबर १७४ व लाखोटीचे शेतांतील हिस्सा मालमिळकतीचें संरक्षण करण्याकरितां दाखला मिळावा ह्मणून अर्ज केल्यावरून या अर्जाचे चौकशीची तारीख २१ माहे जून सन १९०२ इसवी रोजीं आकोला ठिकाणीं नेमली आहे तर या नोटिशीनीं सर्वांस असें कळविण्यांत येते कीं अर्जदाराशिवाय जे इतर नातलग, मित्र आप्त अथवा ज्यांना अज्ञानाचें बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं सदरीं अज्ञानाचें पालन अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याकारितां दाखला आपणांस मिळावा असें इच्छित असतील त्यांनीं आमचे समोर सदरीं तारखेस येऊन हजर व्हावें. आणि आपणास कां नेमावें असें बद्दल जे कांहीं दाखले अगर दस्तऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्या करितां हजर करावें.

आज तारीख २४ माहे जून सन १९०२ इसवी रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी ही नोटीस दिली आहे.

V. N. Dandekar

सिव्हील जड्ज, आकोला.


## जाहिरात.

खालील जिन्नस उत्तम प्रकारचे असून ते योग्य किंमतीला आमच्या दुकानीं विकत मिळतील सर्व माल खात्री लायक आहे,

### पेयें

| | दर डझनास. |
|---|---|
| सोडा वाटर मोठी बाटली | ६ आणे |
| ,, लहान बाटली | ३ आणे |
| लेमोनेड मोठी बाटली | ९ आणे |
| लेमोनेड लहान बाटली | ६ आणे |

### जीन

जिना संबंधी लागणारे सामान जीन, बोल्ट, नट इत्यादि सर्व विक्रीस तयार आहे.

### तेलें.

१ जिनींग आईल. १ सिलींडर आईल.
१ खोबरेल तेल. १ केरोसीन तेल.

### पट्टे

चामड्याचे पट्टे ३ इंची, १½ इंची, चामड्याची बारीक वादी.

चीनी काम.

प्याला रकाबी वगैरे.
एल्युमीनमचा वासण.
गाडीची घरची चरबी,

### रंग

व्हाईट लेड
व्हाईट झीक
ब्राऊन पन्ट
टरपन टाईन वगैरे.

धनजीशा मोटाभाई दारूखानवाला
आणि कंपनी आकोला.

## मित्रांनो अवश्य वाचा.

### खालील पुस्तकें एप्रिल अखेर पर्यंत निम्या किंमतीस मिळतील.

| प्राकृत संस्कृत ग्रंथ बुकें. पुस्तकांचीं नावें. | किंमत. |
|---|---|
| पांडवप्रताप उत्तम मोठे अक्षर | ३ |
| हरीविजय उत्तम मोठें अक्षर | २ |
| नवनाथ भक्तिसार मोठें अक्षर | ३ |
| नवनाथ भक्तिसार मध्यम अक्षर | २॥ |
| दासबोध उत्तम मोठें अक्षर | ३ |
| दासबोध मध्यम मोठे अक्षर | १॥ |
| ज्ञानेश्वरी पोथी मोठें अक्षर | ३ |
| गुरुचरित्र पोथी उत्तम अक्षर | ३ |
| कथासारामृत पोथी उत्तम अक्षर | ३ |
| संत विजय महिपतीकृत ग्रंथ | ५ |
| दीपरत्नाकर उत्तम अक्षर | २॥ |
| रामाश्वमेध पोथी मोठें अक्षर | २॥ |
| तुकाराम नासिकेत पाथी मोठी | १॥ |
| प्राकृत योगवासिष्ठ पोथी | २ |
| शांतिकमलाकर पोथी | ३॥ |
| दत्तमहात्म पोथी अक्षर मोठे | १॥ |
| कथा कल्पतरु १९ वा अध्याय | १॥ |
| शिवलीलामृत पोथी १९ अ० | १॥ |
| शिवलीलामृत पोथी मोठें अक्षर | १। |
| शिवलीलामृत बुक रेशिमी बाधीव | ॥। |
| मूळस्तंभ पोथी मोठें अक्षर | १। |
| अगमनिगम मोठें अक्षर | ॥। |
| विवेकसिंधू मोठें अक्षर | ॥। |

### वैद्यकी संबंधीं पुस्तकें

| | |
|---|---|
| वैद्यदर्पण अनुभविक ग्रंथ | ५ |
| शस्त्रवैद्यक ,, | ४ |
| वैद्यकसंग्रह ,, | ३ |
| वैद्यकशारंगधर ३ खंड मोठा | ३ |
| चिकित्सक ( वैद्यनिरालंबन ) | /८ |
| वैद्यकल्पतरु ( मदनकुतूहल ) | २-८ |
| त्रिबकी वैद्यक | /८ |
| त्रिबकीदीपिकाविवराज | /१२ |
| गरमीचा वैद्य | /६ |
| अनुभविक औषधी पुटके | १ |
| औषधीसंग्रह | /८ |
| औषधीतरंगिणी | /६ |
| औषधीबटवा | -६ |
| रोगपरीक्षा | -१२ |
| सटीक वैद्यामृत | /१२ |
| अश्वशास्त्र वैद्यक | /८ |
| सार्वजनिक व्यवहार परीत्राण | /४ |
| घरचा वैद्य | /६ |
| वैद्यचिंतामणी | /४ |

### ज्योतिषांचीं पुस्तकें

| | |
|---|---|
| ज्योतिषसार व रत्न मध्यम. | १ |
| सहदेव भाडलीकृत ज्योतिष | -८ |
| ,, ,, प्रकाश | -१२ |
| ज्योतिषमंजिरी | /८ |
| ज्योतिषसार व ज्योतिषरत्न | १-८ |
| स्फुटज्योतिष | /२ |
| तत्वबोध ज्योतिष | /३ |

### अद्भुत जादूटोणा

मंत्र, तंत्र, यंत्र यांचीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| इंद्रजाल ( भाग १।२।३ ) | १-२ |
| इंद्रजाल विद्या ( भाग १।२ ) | /६ |
| गारुड्याचा अद्भुत तमाशा | /६ |
| गुप्तविद्या १७१ विषय संग्रह | /८ |
| यंत्रकला प्रकाश | /१२ |

### प्राकृत ग्रंथांतील गोष्टी

| | |
|---|---|
| श्रीरामविजयसार | /१२ |
| श्रीहरिविजयसार | १ |
| श्रीपांडवप्रतापसार | १/४ |
| श्रीसीतारामचरित्र | १ |
| पांडवचाळिशी | /१२ |
| साध्वीस्त्रियांचीं चरित्रें भाग १ | /१२ |
| ,, ,, भाग २ रा | /१२ |
| पतिव्रतासाध्वी स्त्रीचरित्र | /१२ |
| पुराणांतील नकला ( भाग ६ ) | २/४ |
| हरिदासी नकला | /१॥ |
| संतलीलामृतसार | -१२ |
| महासाध्वी द्रौपदी चरित्र | /८ |

### साधीं नाटकें

| | |
|---|---|
| हरिश्चंद्र नाटक | /१० |
| श्रीयाळ नाटक | -१० |
| नरसिंह अवतार नाटक | /४ |
| वत्सलाहरण नाटक | -६ |
| पारिजातक भौमासुर नाटक | -१० |
| प्रमिलास्वयंवर नाटक | /१० |
| बाणासुर नाटक | -१० |
| बकासुर नाटक | -१० |
| बभ्रुवाहन नाटक | -८ |
| कर्णपर्वदुःशासनवध नाटक | -८ |
| लहुकुश नाटक | -८ |
| चित्रसेनगंधर्व नाटक | /१० |
| रावणवध सीताभेट नाटक | /१० |
| सीतास्वयंवर नाटक | -१० |
| सुलोचना नाटक | -१२ |
| दक्षयक्ष नाटक | -८ |
| अहीमहीवध नाटक | -८ |
| सीताहरण नाटक | -८ |
| इंद्रजितवध नाटक | -१० |
| विराटपर्व कीचकवध नाटक | -१२ |
| द्रौपदीवस्त्रहरण नाटक | /१२ |
| रंभाभिसार नाटक | १ |
| कलहपरीणामादर्श नाटक | १॥ |
| श्रीयाळसत्वदर्शन | /१० |
| भीष्मपर्व नाटक | -१२ |
| सुरतसुधन्वा नाटक | -६ |
| सुधन्वावध नाटक | -१२ |
| काळासुर नाटक | -८ |
| मयुरध्वज नाटक | -१० |
| आर्यवसुंधरा नाटक | -१२ |
| चंदनमलयागिरी नाटक | -८ |
| गोपिचंद नाटक | -८ |
| विरसेन नाटक | -१२ |

पत्ता— म्यानेजर पुणेंसमाचार,
ऑफिस बुधवार पेठ
पुणें—सिटी.


☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव

REGISTERED N. No

सहामाही ,, ३ ,, ८८
साल अखेर ,, ७ ,, १ ८८
किरकोळ अंकास .............................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ० ६
दुसरे खेपेस ..............८१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ............................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line... 8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 12 MAY 1902 NO 18

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १२ माहे मे सन १९०२ इ० अंक १८

### खरदी करा !


### रास्कोपची थेट व खरीं पेटेंट वाचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकारितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकास ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकास हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची

रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणाची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल. ग्यारंटी देण्यात येते, व या बद्दलची जोखीम सारी आमचे शिरावर आहे.

सूचना:—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस.....................४०
१९ ,, हंटिंग.............................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............१०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ..................२१
१९ ,, हाफ हंटिंगचें.................२०
१९ ,, हंटिंगचें .......................२०
१४ ,, रिस्ट वॉच ......................२०

इनगन्नेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिंग.............................२०
१४ ,, रिस्टवॉच.........................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग..........................३५
१८ व १९ ,, आपनफेस............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ..................... ४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हीनींगर आणि कंपनी,

ओरिजिनल निनीयन रास्कॉप पेटंट वॉचिसचें साल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

---

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक } A. G. Watson
आकोला १५ जुलै } Agent.
१८९८

### मोरोपंत

निवडक वेंचे. विराट पर्वांतील.
अंक ३५९ सप्तेंबर १९०१ वरून पुढें चालूं.
( दुर्योधनानें गायी वळवून नेल्याची खबर गोपालक देतो )

वि. प. स. ३

गोधन षष्टि सहस्र,
व्रज ओस करूनि नतसे कुटिल
लुटल प्रजाहि जो गो—
पीडक, तो ब्राह्मणा न कां कुटिल ५
( रणांत राजकुमार उत्तर भयभीत झाला त्यास अर्जुनाची उक्ति )
गोमुक्तयर्थ न शिरतां.
धैर्यें, या वीरनायकांनीकीं
करिजेल हास्य आस्यें—
प्रेक्षुनि नगरांत बायकांनीं कीं ४६
आणखी

वि. प. अ. ४

नाळी ज्वलन न बोले,
न वदेचि जरि प्रकाश करि तरणी
न वदोनि कुलज पुरुषहि,
आले स्वयशः प्रकाश करित रणीं ३९
विजयी होऊन राजपुत्र नगरास येत आहे हें वृत्त विराटास कळतें

वि. प. अ. ६

देवा ! कमार आला,
सोडविल्या धेनु पळविलीं कटकें
न वय प्रमाण तेज—
स्वि जनीं; ह्मणती कवी, न तें लटकें ७१
दूतांतें सुखवुनि नृप,
सचिवांसि ह्मण गुढ्या उभारा हो
पुर शोभवा, पुढें जा,
राजपथीं विपज्जन उभा राहो ७४
वाजत गाजत साजत,
आज तया जतन करुनि आणा हो
मज मान मत्स्यांचा,
हा रिपुशशि राहु बाहु राणा हो ७५
असें ह्मणून हर्षभरांत विराटानें धर्मराजाचें चित्त वळवून द्यूत खेळण्यास आरंभ केला.
द्यूत प्रवर्तता तो
भूप ह्मणे ऐकिलेंस कंका ! तें
कुरु जिंकिले कुमारें,
वय तरि अद्यापि उचित अंकीं ८३
धर्म ह्मणे हे कौरव,
किती ? सूत बृहन्नडा कुमारा ज्या
समरीं, अमरींच्या ही,
तो भय देईल कुकुमा राना ८४

---

१ वीर श्रेष्ठांच्या सैन्यांत. २ मुख. ३ पाहून ४ शत्रुरूप चंद्राला राहू सारखा (ग्रासणारा) आहे बाहु ज्याचा असा. हें 'राणा' याचें विशेषण. ५ उत्तरानें, ६ मांडीवर बसण्या योग्य. ७ समरामध्यें देवांस मारील. + अग्नि, * सूर्य. ० कौरव.

मत्स्य ह्मणे र कंकां
शंका सोडूनि बोलसी भलतें
ह्मणसि हें वचन मन्मनीं सलतें ८५
विप्राधमा जरि मनीं,
वांचावें हें अलेख हो मूर्का
न पुन्हा असें वद
सला, ह्मणउनि ह्मणतों, न जीविता मूक ८७
( पुन्हा कंकानें ( धर्मराजानें ) बृहन्नडेची प्रशंसा केली. )
ऐसें सत्य वदे जों,
तों चाली माळ अक्षांना राया
शिकवी युधिष्ठिराच्या,
माळीं, पाणिस्थ अक्ष माराया ९१
( फासे धर्म राजाच्या मस्तकास लागल्यामुळें, भळभळा रक्त वाहूं लागलें इतक्यांत विजयी उत्तरानें सभेंत प्रवेश केला )
उत्तर पित्यासि वंदुनि,
पाहे कंकासि तो सभा कोणी
तातासि पुसे ऐसा,
केला अन्याय हा महा कोणी ! ९९
भूप ह्मणे पुत्रा म्या,
केला स्वकरींचि दंड या कंका
कीं हा करी प्रशंसा,
पंढाची नच धरी मनीं शंका १००
( बृहन्नडा वास्तविक कोण होती व कंक कोण होता हें उत्तरास समजलें होतें )
उत्तर ह्मणे अहाहा !
घडला अन्याय हा घरा पाव
नर्म-क्षाम स्वर्गी—
पायहि; केवळ नव्हे धरीं पाप १०१
नमुनि विराट ह्मणे बा !
कंका ! चुकतों महायशा पावें
न मला सख्या ! तुंबां या,
मदेंधा घेउनि सहाय शापावें १०२
( या प्रमाणें राजानें कंकाची समजूत केली, तरी विजय प्राप्त होण्यास एकटा उत्तरच कारण झाला असें मानून ता मोठ्या कौतुकानें त्यास ह्मणतो )
राजा ह्मणे कुमारा,
या वृत्तें लाज ल्यों कुमारा हो
निंदनि इंदुनिर्मलेशा,
क्षण मौनव्रतीपरा उमा राहो १०५

---

१ विराट २ नपूंसकास ( अर्जुनास ) ३ उगला. मुका. स्तब्ध. ४ असहनशीलता. ५ हातांतील. ६ फांसे. ७ विप्राचा क्षोभ. ८ स्वर्गहानिकर. ९ केवळ धरा ( पृथ्वी ) हानिकर नव्हे. ऐहिक व पारलौकिक सुखास मुकविणारा. १० मत् अवा, माझ्या पातकास. + विराट. ११ विराट. १२ उत्तर. १३ विजयवृत्त, १४ षडानन १५ चंद्रा प्रमाणें शम यश ज्याचें. १६ मुक्याच्या व्रतांत निमग्न. १७ कुमार माता पार्वती. आपल्या पराक्रमी पुत्रास उत्तरानें लाजविलें हें पाहून षडानन माता पार्वती क्षणभर स्तब्ध राहो.

त्वां जिंकिला कसा तो
अश्वत्थामा तसाचि तो कर्ण
तोहि द्रोण महात्मा,
दिव्यधनुर्वेद शंभु- गोकर्ण १०६
केला कसा कृपाचा
भंग ? कसा पळविला सुयोधन गा
कैसा भीष्म प्रमुखां,
स्वभुज-अशनि कळविला सुयोधनगां १०७

( तो खरें वृत्त कथन करितो.

उत्तर ह्मणे पित्या कुर्हे.
पाहुनि झालों भयाकुल पळालों
सिंह प्रेक्षुनि यूथ-भ्रष्ट
कलभ साच मी बहु गळालों १०८

इतक्यांत देवपुत्र ( वास्तविक ) अर्जुन येऊन त्यानें मोठा पराक्रम केला व मला यश दिलें. उत्तरानें देव पुत्राच्या पराक्रमाचें वर्णन केलें.

अरि सेनेसि न वरतें,
पाहूं दे जेंवि साधु कुलटेतें
काय वदूं गुरु, गुरुसुत,
जिंकुनि भीष्मावरीहि उलटे तें ११३
मत्स्य ह्मणे तद्दर्शन,
तुज घडलें तें मलाचि कां नाहीं ?
नेत्रें बहु तळमळती,
लाभ मिळविला मलाचि कांनाहीं ११६
सर्वस्वें पूजावा,
तो आह्मां माय बापसा मान्य
लीलेनें हरिला जारे,
तेणें, हा ताप काय सामान्य ! ११७
सांग कसें तुज दिसतें,
तो मज दावील काय पार्थ सखा
याहुनि उणाचि दुकळीं,
ह्मणतो 'हो पुष्ट-काय पायस खा' ११८

वि. आ. का.

१ दिव्य असा धनुर्वेद हाच शिव. बाल गोकर्णा प्रमाणें आश्रयस्थान द्रोण. शिवाचें आवडतें स्थान जसें गोकर्ण तसें धनुर्वेदाचें प्रिय निवासस्थान द्रोण. द्रोणाचार्यांचे धनुर्विद्यानैपुण्य सूचविलें आहे. २ स्वबाहुरूपवज्र. ३ उत्तम वीर रूप पर्वत. ४ कौरव वीर सैन्य. ५ कळपांतून चुकलेला. ६ गज बालक. ७ व्यभिचारिणी, ८ विराट. ९ त्या देव सुताचें. १० तो देव पुत्र आपल्या चरणांचें दर्शन मला देईल काय. ११ ह्मणणारा. १२ शरिरानें पुष्ट. १३ खीर १४ 'खीर खा आणि शरिरानें पुष्ट व्हा असें दुष्काळांत ह्मणणारा मनुष्य या देव पुत्राहून कमीच होय.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध ५ शके १८२४

## औद्योगिक परिषद्

आकोल्यास औद्योगिक परिषद् स्थापित झाल्या विषयीं आह्मी पूर्वींच लिहिलें आहे. ही मंडळी मोठमोठ्या लोकांच्या आश्रयानें उभारली असून तिची कार्यमालाही मोठी व्यापक आहे. अशा मोठ्या कार्यमालेला कितीही मांडवल पुरेसें नाहीं. तथापि १ लक्ष रुपयांच्या भांडवलावर ही मंडळी आपल्या उद्योगाला प्रारंभ करणार आहे. ही मंडळी कार्य करणारी होईल तर आह्मांला एक संजीवनी मात्राच लाभल्या सारखें होईल. या मंडळीचे पुरस्कर्ते मोठ्या उत्सुकतेनें झटत आहेत आणि राष्ट्रीय कल्याणासाठीं स्वार्थाचा यज्ञही करण्यास तयार आहेत. पुष्कळदां अशा मंडळ्या कागदावर चांगल्या रंगतात आणि त्यांचें अस्तित्व क्षणभंगुर कागदा बरोबरच लयाला जातें. चित्रांतले घोडे सर्वजण सुखानें नाचवितात पण तद्वत् प्रकार या मंडळी विषयीं घडणार नाहीं असा आह्मांस मोठा भरंवसा आहे. या मंडळी मध्यें कार्यशक्ति मोठी आहे आणि ही मंडळी आपल्या कृतीनें सर्व जगांस कित्ता घालून देण्यास चुकणार नाहीं असें आह्मांस प्रस्तुतच्या चळवळी वरून वाटत आहे.

पण या औद्योगिक परिषदे संबंधानें थोडासा गैरसमज होण्याचा संभव आहे. प्रथमतः असें दाटतें कीं देशी कलाकौशल्याचे व हुन्नराचे कारखाने काढण्याचें काम ही मंडळी हातांत घेणार आहे. पण विशेष खुलासा घेतला असतां असें कळतें कीं ही मंडळी आपलें भांडवला पैकीं निम्मे भांडवल शेतीचा धंदा करणाऱ्या लोकांस कर्ज देण्या कडे खर्च करणार आहे. निम्या भांडवलांत ह्मणजे पन्नास हजार रुपयांत देशी उद्योगाची वृद्धी करावयाची आहे. प्रथमतः शेतकी ह्मणजे एक उद्योग आहे आणि अर्थात् तत्संबंधी गोष्ट ह्मणजे औद्योगिक मंडळीच्या कार्यक्रमांतीलच एक कार्य होय. अशा रीतीनें औद्योगिक मंडळीची कार्यमाला विस्तृत झाली हा संतोषाचा प्रकार होय. पण विस्तृतते बरोबर ती कार्यमाला पोकळ व बिनजोर होत जाईल. अशी आह्मांस भिती वाटते. औद्योगिक गोष्टीला देखील उत्तेजन देण्याचा संकेत चांगला आहे पण हा संकेत फलद्रूप करण्याचा मार्ग बरोबर शोधून पाहण्यांत आला आहे असें आह्मांस वाटत नाहीं,

या मंडळीच्या उद्योगा पैकीं पहिला उद्योग शेतकरी लोकांस मदत करण्या संबंधानें आहे. हल्लीं सरकारांतून शेतकऱ्यांची पेढी स्थापित करण्या विषयीं पुष्कळ वाटाघाट चालूं आहे सरकारचा अभिप्राय असा दिसतो कीं खेड्यापाड्यांतून जे सावकार असतात त्यांनीं आपलें भांडवल उभारावें आणि दरमहा दर शेंकडा १ रुपया पेक्षां अधिक नाहीं अशा व्याजानें शेतकऱ्यांस त्यांनीं कर्ज द्यावें ह्मणजे सरकारांतून स्टांपाच्या व कर्ज वसूल करण्याच्या पुष्कळशा सवलती मिळतील. या सरकारी सूचने प्रमाणें खेडोपाडीं किंवा गांवोगांव ज्या पेढ्या स्थापित होतील त्या पेढ्यांस भांडवलाची मदत देण्याचा उद्देश या औद्योगिक मंडळीचा आहे. अगोदर अशी पेढी निघण्याची आशाच फार थोडी आहे तेव्हां तिला भांडवलाची मदत करण्याची गरज तितक्याच मानानें पडणारी आहे. या दृष्टीनें औद्योगिक मंडळीचें निम्में भांडवल व्यर्थ पडून राहणार आहे. शेतकऱ्यांची पेढी स्थापित होण्यालाच हजारों अडचणी आहेत आणि या अडचणींतून जर एखादी पेढी सुरक्षित निघेल तर तिला औद्योगिक मंडळीच्या भांडवलाची गरज पडेल असें आह्मांस वाटत नाहीं. सरकाराच्या मनांतून शेतकऱ्यांची पेढी घालावयाची आहे आणि लोकांसही तिची गरज मोठी आहे तथापि भांडवलाच्या मानानें या भानगडींत औद्योगिक मंडळीनें पडावें असें आह्मांस वाटत नाहीं. औद्योगिक मंडळीनें व्यापारी भुगोल तयार करण्याचें काम हातीं घेतलें आहे. हें काम ह्मणजे कोणत्या गांवीं कोणत्या वस्तु तयार करितात, लोकांच्या गरजा कोणत्या आहेत, त्या त्या वस्तु तयार करण्याचीं साधनें कितपत उपलब्ध आहेत वगैरे गोष्टींच्या माहितीचें पुस्तक तयार करण्याचें होय. ही माहिती मिळविण्यासाठीं औद्योगिक मंडळीनें मुद्दाम माणसें नेमिलीं आहेत असें कळतें. आमच्या मतें ही गोष्ट सरकारी रितीनें तहशिलदारांच्या मार्फतीनें होईल तर फार चांगल्या रीतीनें सिद्धीला जाईल. या कामा निमित्त वेगळा खर्च मंडळीच्या फंडांतून मों पर्यंत न होईल तितकें बरें !

आमच्या दृष्टीनें या मंडळीचा फंड फारसा मोठा नाहीं. सर्व प्रकारच्या कलाकौशल्याला किंवा उद्योगाला हात न लावतां एखादीच गोष्ट हातीं घेतली पाहिजे. उदाहरणार्थ कपडाच कां होईना. या जिल्ह्यांत कपडा तयार करावा इतकेंच नाहीं तर तो विकविण्याच्या हीतजविजी केल्या पाहिजेत. जी गोष्ट कापडाची तीच इतर देशी पदार्थांस सारखी लागूं पडेल. सारांश सर्वच गोष्टी एकाच मंडळीनें हातीं घेतल्या पासून एकही गोष्ट सिद्धीला जात नाहीं हें विसरतां कामा नये.

## प्रांतिक प्रश्न

वऱ्हाड प्रांता संबंधानें पहिला तह १८५३ सालीं झाला व पुढें १८६१ सालीं दुसरा तह झाला. १८६१ पासून १८९६ पर्यंत २५ वर्षांची सरासरी घेतली तर असें आढळेल कीं दरसाल १२ ½ लक्ष रुपये शिल्लक राहत होते, पण सरासरीच्या आंकड्या पेक्षां १८९६-९७ चे आंकडे फार महत्वाचे आहेत. त्या सालची एकूण जमा १,००,७५,५६० रुपये आहे. यांतून राज्यकारभाराचा खर्च वजा जातां बाकी शिल्लक सरासरी ५३ लक्ष रुपये राहिले होते. या पैकीं लष्करी खर्च वजा करावयाचा आहे; जमिनीचा सारा ६७ लक्ष रुपया जवळ आहे. तो सवाईनें वाढला आहे असें धरलें तरी १६ लक्षांची वाढ होत आहे हें पक्कें आहे. तेव्हां यापुढें दरसालचा हल्लींचा खर्च वजा जातां ५३ लक्ष रुपया ऐवजीं ६९ लक्ष रुपये शिल्लक राहतील. यांतूनहि लष्करी खर्च वजा करावयाचा आहे. ७५०० लोकांची पलटण सध्यां आहे. तिचा खर्च ३९ लक्ष रुपये येतो. या पुढें हें लष्कर ४५०० लोकांचें होणार आहे तेव्हां सढळ प्रमाणानें खर्च आकारला तरी ३० लक्ष रुपये पुष्कळ होतील. ६९ लक्ष रुपयांतून ३० लक्ष रुपये वजा जातां बाकीं ३९ लक्ष रुपये शिल्लक राहतात या पैकीं ३४॥ लक्ष रुपये निजाम सरकाराला देण्याला कांहींच हरकत नाहीं. कारण या व्यवस्थेनें देखील इंग्रज सरकाराला ४॥ लक्ष रुपये नफ्याचेच मिळणार आहेत. आह्मी ३४॥ लक्ष रुपये हा आंकडा निमवटाईच्या नियमानें धरला आहे. राज्यकारभाराचा खर्च वजा जातां ६९ लक्ष रुपये शिल्लक राहतात. त्याची निम्मी रक्कम स्वामित्वाबद्दल मागण्याला कांहींच प्रत्यवाय नाहीं. कारण बाकीच्या ३४॥ लक्ष रुपयांतून ३० लक्षांत लष्कर ठेवून शिवाय ४॥ लक्ष निव्वळ नफा निराळाच मिळत आहे.

पण ३४॥ लक्ष रुपये स्वामित्वा बद्दल ठरविले तरी निजाम सरकाराकडे सार्वभौम प्रभूचें २ कोटी रुपये कर्ज आहे आणि या शिवाय गेल्या दुष्काळाचा खर्च १ लक्ष ४० हजार रुपये निजाम सरकारापाशीं मागण्यांत येत आहेत. या मागणींत आह्मांस कांहीं भलेपणा दिसत नाहीं. दुष्काळामुळें ७७॥ लक्ष रुपयांची तूट पडली आहे ती मात्र देणें रास्त आहे. ही तूट ७७॥ लक्ष असून २ कोट रुपये कर्ज आहे. त्यांत व्याज वगैरे मिळवून तीन कोट रुपये, २० वीस वर्षांत दरसाल १५ लक्ष रुपये प्रमाणें निजाम सरकारांनीं इंग्रजांस द्यावे. खरोखर व्याज आकारतां कामा नये. तहनामा असा आहे कीं दर शेंकडा २५ रुपया पेक्षां खर्च अधिक करूं नये. हा खर्च शेंकडा ५० पर्यंत केलेला आहे आणि या शिवाय पुष्कळ गोष्टी व्याजाच्या मागणी विरुद्ध सांगण्यासारख्या आहेत. तथापि गोळा बेरजेनें सर्व कर्ज वगैरे मिळून तीन कोटीची रक्कम जोडली आहे आणि एवढ्यांत सरकारांनीं संतुष्ट व आनंदित असावें.

या शिवाय आणखी एक सूचना अशी आहे कीं, कौलपट्ट्याच्या रकमेची वीस वीस वर्षांनीं दुरुस्ती करण्यांत यावी. वीस वर्षांच्या कालांत उत्पन्न वाढलें असेल तर स्वामित्वाची रक्कम वाढविण्यांत यावी आणि तें उतरलें असेल तर कमी करण्यांत यावी. ही सूचना देखील अगदीं यथायोग्य आहे. वरील गोष्टी वरून सध्यांचा वादविषय चांगला लक्ष्यांत येईल; आणि या प्रश्नाचा निकाल कसा होईल हें अनुमान बांधण्यास वरील विवेचन पुष्कळसें उपयोगी पडेल.

कौलपट्ट्यानें हा प्रांत घेतल्या नंतर तो मुंबईकडे किंवा मध्यप्रांताकडे येत्या १०।२० वर्षांत देण्यांत येईल असें आह्मांस वाटत नाहीं पण इतकी गोष्ट निर्विवाद दिसते कीं खर्च कमी करण्यासाठीं सहा जिल्ह्यांचें चार जिल्हे लवकरच करण्यांत येतील. आह्मी सध्यां वऱ्हाडच्या इतिहासांत क्रांतिकाला समीप आहों तेव्हां परमेश्वर कृपेनें माझी स्थिती अधिक कल्याणप्रद होवो एवढीच इच्छा आहे.

## सुख आणि श्री.

सुखाचा अर्थ बोध सर्वांस होतो पण त्याची व्यापक व्याख्या कोणासही बरोबर देतां येणार नाहीं, सुख हें मनाची सृष्टी होय हें कोणत्या स्थितींत मिळेल याचा नियम नाहीं. त्याला श्रीमंतीच लागते असें नाहीं. गरिबींतही सुख मिळूं शकतें. सुखसमाधानी

प्राप्त करून घेण्याची कला मोठी विकट आहे. सुख संपादण्याला चतुरस्रता मोठी लागते. पुष्कळदां अशी चकभूल होते कीं जें सुखाचें साधन असतें त्यालाच अति निकट परिचयानें आपण सुख ह्मणूं लागतों. श्रीमंतीनें सुख मिळतें ह्मणून तादात्म्यभावानें लोक श्रीमंतीलाच सुख ह्मणूं लागतात. श्रीमंतीचा उपयोग सुखाच्या गोष्टी मिळविण्याकडे होत असतो. हीहि गोष्ट कांहीं खोटी नाहीं कीं श्रीसंपत्ति मिळवितांना मनुष्य इतका हैराण होतो व इतक्या नानाविध खटपटी करितो कीं श्रीमंती पासून मिळणाऱ्या सुखलोटा पेक्षां श्रीमंती पैदा करण्याचा उपसर्गच सर्व आयुष्याचा व्यय करितो. अनेक वेळां असा अनुभव येतो कीं श्रीमंती संपादण्याचा मार्ग क्रमतां, क्रमतांच कांहीं माणसें भलाच घोपट रस्ता धरितात आणि कांहीं जण लवकर श्रीमंत होण्यासाठीं सच्चाला, प्रामाणिकपणाला व इभ्रतीला तिलांजली देत असतात. स्थूळ मानानें पाहतां श्रीचें ऐहिक वैभवच मनुष्याच्या डोळ्यापुढें फार चकाकते आणि जो तो या मृगजळाच्या नादानें सैरावैरा धांवत असतो. कित्येक माणसें श्रीमंतीच्या डोंगरवाटा चढून शिखरावर जाऊन तेथील सुखोपभोग घेतात आणि कित्येक माणसें श्रीमंतीच्या डोंगरावर चढतांना पायवाटा चुकतात आणि प्रापंचिक दऱ्या, खोरीं संकटमय गर्ता इत्यादि ठिकाणीं आपला आयुष्यक्रम कंठतात. ही चूक मोठी होते कीं साधनाच्या मार्गे लागून आपण आपलें इष्ट क्षितिज जें सुख त्याच्या जवळ कधींच पोंचत नाहीं, साधनाच्या हव्यासांत मूळचा इष्ट पदार्थ आपण हातांतला गमावतो ही चूक होऊं नये ह्मणून आपण साधनाची गोष्ट व साध्य वस्तु या मधील परकीयपणा विसरतां कामा नये.

श्रीला मिळविण्यासाठीं कोणी अहर्निश झटूं नये असें मात्र आह्मी ह्मणत नाहीं. श्रीच सर्व जग आपलेंसें करिते. तिला विन्मुख आपण असलों ह्मणजे जग आपल्याला नवखें व परकी आहे असें समजावें. तिची आकर्षणशक्ति अगम्य आहे. सर्व गुणसंपन्नता तिच्या चरणीं लीन होत असते. तिचा महिमा वर्णन करितांना सर्व थकले आहेत. तिची थोरवी यथार्थ जाणतांना वेदान्ती लोक तिला परमेश्वराची वामांगी करितात. परमेश्वराच्या ध्यानांमध्यें जशा सर्व वाचा बंद होतात आणि अगम्य व अतर्क्य गोष्टींनीं मती गुंगते तद्वत्च प्रकार श्रीचा पराक्रम पाहतांना घडून येतो. अर्थात श्रीच्या भजनीं लागावें व तिच्यासाठीं देह झिजवावा हें खरें पण तसें करितांना तिच्या द्वारें मिळणाऱ्या सुखाला आपण अंतरूं नये. हें सुख ऐहिक होय पण हें देखील अनुभवण्या सारखें आहे हें त्याज्य व निंद्य नाहीं. ज्ञानार्जनाला जशी शरीरसंपत्ति फलदायी होते तद्वत् श्रीने दिलेलें सुख परम उत्कृष्ट कोटींतल्या अवर्णनीय पारमार्थिक सुखाला नेणारें आहे. पारमार्थिक सुखाला ऐहिक सुख हा एक सोपान आहे. तो सोपान चढून अनुपमेय विज्ञानसुख भोगण्याच्या शिखरापर्यंत मजल मारावयाची असते. जर आपण आसमंताच्या सृष्टीवैभवांतच रममाण झालों तर आपल्या आयुष्यांतील उच्चतर मार्ग आपण रोखला असें होईल. श्रीपासून जें सुख उपलब्ध होतें त्या सुखानें आपणाला पुष्टता व सामर्थ्य मिळतें. या नव्या संपत्तीनें आपण सुखाची कक्षा विस्तृत केली पाहिजे आणि उत्तरोत्तर नव्या नव्या सुखाचा लाभ घेतला पाहिजे सुख मिळविण्यासाठीं ह्मणून साधनांतच आपण बुडूं नये. त्यांची कार्यशक्ति गुप्त न ठेवितां त्या त्या साधनापासून सुखाचा अभिलाष परिपूर्ण केला पाहिजे. आणि सुख सुख ह्मणून आपण ज्या गोष्टींच्या नादीं लागतों त्या गोष्टींची अंतर्गत कार्यशक्ति विसरतां कामा नये. ह्या अंतर्गत शक्तीनें ह्मणजे एका सुखानें दुसऱ्या उच्चतर सुखाच्या पायरीवर नेऊन सोडलें पाहिजे. अर्थात् सुखाच्या कल्पना अहर्निश पालटत गेल्या पाहिजेत. जें सुख आज वाटतें त्यानें वरिष्ट सुखाचा उंचवटा दाखविला कीं आपण त्या सुखाला साधना पलीकडे गणतां कामा नये. ही एका प्रकारची श्रेणी आहे. आणि सुखाचा विषय बदलत गेला ह्मणजे एका प्रकारचें सुख हें दुसऱ्या प्रकारच्या सुखाचें साधन बनतें. पहिली साध्य वस्तु पुढें साधन बनते आणि अशा रीतीनें क्रमशः सुखाची लूट करून घेतां येईल.

परमेश्वराची योजना मोठी अजब आहे. सुखाचा खजिना कधींही न संपणारा आहे पण तेंच मिळविण्याचीं साधनें मात्र पुरेशीं नाहींत. श्रीचा खजिना रिता होईल पण सुखाचा खजिना रिता न होतां तो एका अंतर्गृहांतून दुसऱ्या अधिक रमणीय व आल्हादकारक अंतर्गृहांत नेतो. श्रीच्या तिजोऱ्या रित्या होतात पण सुखाच्या खोलीचें पहिलें कुलूप उघडलें कीं त्याच्या अंतर्गत अशीं गृहांत गृहें असंख्य आहेत. प्रत्येक अंतर्गृहाला कुलूप आहे. तें उघडण्याची किल्ली ह्मणजे सुखाची उच्चतर कल्पना होय. सुख ही मानसिक कला आहे. ती रबरा प्रमाणें संकोचित व विस्तृत होते. कृपणाला धन संचित करण्यांत सुख वाटतें ह्मणून तो कूर्मा प्रमाणें धनाचीं सर्व अंगें आंत लपवून ठेवितो. तेंच धन उदारधी नराला वाटण्यांतच सुख वाटतें. तें दुसऱ्यांस दिलें, आणि त्या गरजू याचकाची मुखश्री विकसित झाली ह्मणजे त्या त्याच्या हास्य मुद्रेनें याला सुख होतें. एक जण धनाला खराची संकोचवृत्ति देतो आणि दुसरा धनाला खराची विस्तृती देतो. धन दिल्या घेतल्यानें कमी होतें पण सुख दिल्या घेतल्यानें वृद्धि पावते. सुख ही विद्या आहे आणि ती विद्या देणारीं मुख्य साहित्यें ह्मणजे श्री होय. विद्येला जशीं शालागृहें, शिक्षकवर्ग शरीरसंपत्ती हीं साधनें होत तद्वत् सुख देण्याला श्री हें एक साधन आहे. सुख काल्पनिक आहे. सुखाची कल्पना वाढवा ह्मटल्यानें ती वाढत नाहीं. त्याला अनुवंशिक संस्कार लागतात; दृष्टी दीर्घतर करणारा सत्समागम पाहिजे आणि मनाची आतुरताही मोठी पाहिजे सारांश, सुखानें सुख वाढतें पण तें वाढविणारा नरश्रेष्ठ श्रीचा दास न बनतां तिचा धनी बनतो आणि पहिल्या सुखाच्या अंकित न होतां त्याचा दुसऱ्या सुखाला पायरी प्रमाणें उपयोग करितो, ही सुखाची गुरुकिल्ली समजण्याच्या शाळेंतच आपण जाऊं तर मग सौख्याला काय कमी आहे !

# The Berar Samachar

MONDAY MAY 12 1902

The idea of an agricultural bank is most fascinating; but it does not present to us a hopeful prospect. The more we think of its possibilities the more distant the vision of such a bank appears to our plain mind. The idea of a bank is a very nice one. It looks like the millennium of the agricultural population. But when we enter into the domains of practical politics we find ourselves in a sea of difficulties. The Government of India have put on paper a cut and dry proposal as to how the existing money—lending agencies can be formed into a corporate bank under their own special auspicies. The Government also propose to offord facilities for the recovery of debts lent by such a bank. The recovery will be effected by a summary procedure and there will be a further concession as regards the priority of one debt over another. We would heartily wish every success to the programme of the Government. We will do our utmost to induce the people to appreciate the valuable assistance the Government promise to render to a village bank or rather an agricultural loan—agency. But the real difficulty begins when we attempt at a formal co-operation of the money-lending agencies that exist at present. We have shown in our last issue that the condition of our province is not much favourable to the co-operation of the existing money—lenders. The class of money—lenders in Berar is deadly antagonistic to the very proposal of forming a new bank with the avowed purpose of helping the indebted and the needy agriculturists. The very essentials of the co—operative credit societies are against the profession of these money—lenders. The promise of special concessions is not much attractive and will not be welcome in right earnestness. We are sorry to have to complain against the present usury and the agencies that conduct it. We do not see in them a healthy life for co—operation. The difficulty is how to utilize the existing money—lending agencies. We do not hit upon a plan of uniting these disintegrate forces into a harmonioous banking agency. The cement of unification is wanting in the proposal of the Government. The collection of capital for the purpose of making loans for objects industrially or agriculturally productive is not such a work as will fall within the acceptance of the present money—lenders. We want the capital for such a philanthropic object of the Government. The task is rather a *royal* one. It will not be an accomplished fact if the Government hold themselves aloof, simply promise special concessions and do not provide the agricultural bank with funds from the exchequer of the state. The down—fall of the agriculturists is a matter of deep concern to the Government and it is their parental duty to arrest the forces that go to bring on the decline of the general masses. The Government should find out capital to institute an agricultural bank and then call upon the people to co—operate with their money for the noble purposes which the Government have in view. The position which the Government allot to themselves is that of a friendly adviser. An advice is worth nothing if the Government do not put their own treasury to the risks of the new experiment. The aloofness of the Government in the matter of providing funds is most fatal to the creation of a co—operative credit society. The money—lenders should be afraid of having to close their shops in case they do not join with the Government; but, there is no such item of vitality in the proposal of utilizing the existing money—londing agency. There should be at first a strong and powerful rival to put down the growth of the prevailing loan—agencies. People must find a cheap loan—market in the banks which the Government will institute and provide with their own funds. Before we get such a bank the view of doing away with the evils of the lending business in Berar is not likely to approach a degree of success. The money—lenders must be forced to see the necessity of co—operating with the lending corporation founded with the help and the money of the Government. Herein lies the key to the success of an agricultural bank in this province and unless the Government grapple with the difficulty of collecting the funds we do not see the advisibility of launching ourselves into schemes of a general usefulness to the people of this province who stand most in need of loans at a moderate rate of interest.

## वऱ्हाड

मि. एदलजी जमशेटजी संजाना एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस गेल्या शनिवार पासून पेनशन मिळालें आणि त्यांच्या कोर्टाच्या कामाचा तूर्तातूर्त चार्ज रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर यांनीं घेतला.

मि. निजामुद्दीन व मि. यासीनखान हे दोघेही गृहस्थ वऱ्हाडांत डिपुटी कमिशनरीच्या दर्ज्याचे आहेत. वऱ्हाड सरकाराकडून यांस निजाम सरकारानें बोलावून घेऊन आपल्या पदरीं हायकोर्टाच्या न्यायाधिशाच्या जागा दिल्या होत्या. पण हे दोघेही गृहस्थांत पुन्हां वऱ्हाडांत परत येऊन डिपुटी कमिशनर होत आहेत. त्यांच्या पुनरागमनानें इकडील मोठ्या मोठ्या अधिकारी मंडळींत मोठीच पिछेहाट होणार आहे ही गोष्ट मोठी नुकसानीची होय.

रा० रा० धोंडू हरी लळिंगकर, तहशिलदार, मूर्तिजापूर यांस २ रे वर्ग माजिस्ट्रेटीचे अधिकार देण्यांत आले.

रा० रा० वामन गणेश देशपांडे तहशिलदार, मेहकर यांस दोन महिन्यांची रजा देण्यांत येऊन त्या रजेंत रा० रा० शिवराव देवराव यांस तहशिलदारी देण्यांत आली.

स्तुत्य विचार— शेट बेगराज प्रसादीराम हे आकोला नेटिव लायब्ररीच्या मैदानांत विहिर खणण्यासाठीं ६१७ रुपयांची देणगी देण्याच्या विचारांत आहेत.

**दुरुस्ती—** वऱ्हाडसमाचार तारीख ५ मेचा अंक १७ या मधील तिसऱ्या पृष्ठाव. र ४ थ्या कालमांत २३ वे ओळींत "साऱ्या बद्दल रकम रुपये १०० शंभर नगदी ' असें छापलें आहे तर्थे ' इमाऱ्या बद्दल रकम रुपये १०० शंभर नगदी ' असें वाचावें.

गेल्या फेब्रुवारी महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत १०९६९ माणसें जन्मलीं व ९८९३ मरण पावलीं.

---

**सूर्याचीं पिलें**—कान उपटून हातीं देण्याच्या कृतीला सूर्याचीं पिलें दाखविणें असें म्हणतात. ही वर्णनीय कृती थोडे दिवसां पूर्वी कलकत्याच्या कालेजाचे प्रोफेसर डाक्टर केली यांनीं करून दाखविली. एक तीन वर्षांच्या जुन्या विद्यार्थी एका रोग्याचे कान पितळी पिचकारीनें स्वच्छ करीत होता इतक्यांत साहेबांस वाटलें कीं पिचकारी चुकून दुसरी घेण्यात आली. डाक्टर केली हे या विद्यार्थ्यांस प्रश्न विचारीत जवळ गेले आणि त्यांनीं त्याच्या चुकीबद्दल कान उपटून दिला. असें शिक्षक या शतकाला शोभत नाहीं! विद्यार्थ्यांनें गुरूचें श्रीमुख रंगविलें असतें तरी या कालाला ती गोष्ट यथासांग झाली असती। डाक्टर केली यांस प्रोफेसरी पेक्षा जेल सुपरिन्टेंडेंटीची जागा विशेष लाभेल तर सरकारानें त्यांची योजना इतरत्र करावी.

रक्तपितीचा रोग खारवलेले मांस खाणारे लोकांस पुष्कळ जडतो असा ब्रह्मी लोकांस अनुभव येत चालला आहे तर मांस भक्षणाऱ्या लोकांनीं त्या अनुभवाचा फायदा करून घ्यावा-

सर लिपेल ग्रिफिन यांनीं विलायतेस एक व्याख्यान दिलें त्यांत हिंदुस्थानांतून लोक घऊन दक्षिण आफ्रिकेंत वसाहत करावी अशी सूचना होती. चमत्कार इतकाच कीं याच बातमी बरोबर दक्षिण आफ्रिकेंत जन्म पावलेल्या हिंदी प्रजेवर देखील डोईपटी बसविण्याचा तिकडील सरकारचा बेत आहे असें ऐकण्यांत आलें आहे.

---

## नोटीस.

बेडमी गणपती वल्लद रामजी महाली राहणार तऱ्हाळ तालुका मंगरूळपीर–यास.

या जाहिर लेखानें कळविण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून मी शहाणी होण्यालाही सहा सात वर्षे झालीं तुह्मापाशीं साल्पी गांवी मी राहण्यास आले आणि घरसंसाराला तुह्मी मनबरोबर लागावे ह्मणून पुष्कळ प्रयत्न केले. मी वर्षभर तुह्मापाशीं राहिले परंतु तुमच्या हातून माझा संसार होण्याचा संभव दिसत नाहीं. माझा जन्म फुकट चालला आहे आणि माझे आईबापही मला पोसू शकत नाहीं. त्यांनी माझ्याकारितां आजपावेतों सावकारी दोनशे रुपये तुमच्या नांवावर कर्ज काढिले आहेत. यापुढें सावकारही पैसा देत नाहीं, तुह्मी चार पंचाची खात्री करून माझ्याशी जनरिती प्रमाणें संसार करावा. तसें होत नसल्यास आठ दिवसांत मागील पोटगीचा खर्च देऊन मला फारकतनामा करून द्यावा. ह्मणजे मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. तारीख ९ मे १९०२ इसवी.

सही.

प्रयागबाई उर्फ अंबाबाई मर्द गणपती

राहणार दहिगांव तालुके आकोला

इची निशाणी बांगडी.

---


## जाहिरात.

खालील जिन्नस उत्तम प्रकारचे असून ते योग्य किंमतीला आमच्या दुकानीं विकत मिळतील सर्व माल खात्री लायक आहे,

### पेयें

दर डझनास.

| | |
|---|---|
| सोडा वाटर मोठी बाटली | ६ आणे |
| " लहान बाटली | ३ आणे |
| लेमोनेड मोठी बाटली | ९ आणे |
| लेमोनेड लहान बाटली | ६ आणे |

### जीन

जिना संबंधी लागणारे सामान जीन, बोल्ट, नट इत्यादि सर्व विक्रीस तयार आहे.

### तेलें.

१ जिनींग आईल. १ सिलींडर आईल

१ खोबरेल तेल. १ केरोसीन तेल.

### पट्टे

चामड्याचे पट्टे ३ इंची, १ १/२ इंची, चामड्याची बारीक वादी.

चीनी काम.

प्याला रकाबी वगैरे.

एल्युमीनमचा बासण.

गाडीची घरची चरबी,

### रंग

व्हाईट लेड

व्हाईट झींक

ग्रीन सीस मीनरल

ब्राऊन पेन्ट

टरपेन टाईन वगैरे.

धनजीशा मोटाभाई दारूखानवाला

आणि कंपनी आकोला,

---

## मित्रांनो अवश्य वाचा.

खालील पुस्तकें एप्रिल अखेर पर्यंत

निम्या किंमतीस मिळतील.

प्राकृत संस्कृत ग्रंथ बुकें. किंमत.

पुस्तकांचीं नांवें.

| | |
|---|---|
| पांडवप्रताप उत्तम मोठें अक्षर | ३ |
| हरीविजय उत्तम मोठें अक्षर | २ |
| नवनाथ भक्तिसार मोठें अक्षर | ३ |
| नवनाथ भक्तिसार मध्यम अक्षर | २॥ |
| दासबोध उत्तम मोठें अक्षर | ३ |
| दासबोध मध्यम मोठें अक्षर | २॥ |
| ज्ञानेश्वरी पोथी मोठें अक्षर | ३ |
| गुरुचरित्र पोथी उत्तम अक्षर | ३ |
| कथासारामृत पोथी उत्तम अक्षर | ३ |
| संत विजय महिपतीकृत ग्रंथ | ५ |
| दीपरत्नाकर उत्तम अक्षर | २॥ |
| रामाश्वमध पोथी मोठें अक्षर | २॥ |
| तुकाराम नासिकित पोथी मोठी | १॥ |
| प्राकृत यागवासिष्ठ पोथी | २ |
| शांतिकमलाकर पोथी | ३॥ |
| दत्तमहात्म पोथी अक्षर मोठे | १॥ |
| कथा कल्पतरु १९ वा अध्याय | १॥ |
| शिवलीलामृत पोथी १९ अ० | १॥ |
| शिवलीलामृत पोथी मोठें अक्षर | १। |
| शिवलीलामृत बुक रेशिमी बांधीव | ।\|\| |
| मूळस्तंभ पोथी मोठें अक्षर | १। |
| अगमनिगम मोठें अक्षर | ।\|\| |
| विवेकसिंधू मोठें अक्षर | ।\|\| |

### वैद्यकी संबंधीं पुस्तकें

| | |
|---|---|
| वैद्यदर्पण अनुभविक ग्रंथ | ५ |
| शस्त्रवैद्यक " | ४ |
| वैद्यकसंग्रह " | ३ |
| वैद्यकशारंगधर ३ खंड मोठा | ३ |
| चिकित्सक ( वैद्यनिरालंबन ) | ८८ |
| वैद्यकल्पतरु ( मदनकुतूहल ) | २०८ |
| त्रिबकी वैद्यक | ८८ |
| त्रिबकीदीपिकावैद्यराज | ८१२ |
| गरमीचा वैद्य | ८६ |
| अनुभविक औषधी चुटके | १ |
| औषधीसंग्रह | ८८ |
| औषधीतरंगिणी | ८६ |
| औषधीबटवा | ०६ |
| रोगपरीक्षा | ०१२ |
| सटीक वैद्यामृत | ८१२ |
| अश्वशास्त्र वैद्यक | ८८ |
| सार्वजनिक व्यवहार परीत्राण | ८४ |
| घरचा वैद्य | ८६ |
| वैद्यचिंतामणी | ८४ |

---

### ज्योतिषांचीं पुस्तकें

| | |
|---|---|
| ज्योतिषसार व रत्न मध्यम. | १ |
| सहदेव भाडळीकृत ज्योतिष | ०८ |
| " " प्रकाश | ०१२ |
| ज्योतिषमंजिरी | ८८ |
| ज्योतिषसार व ज्योतिषरत्न | १०८ |
| स्फुटज्योतिष | ८२ |
| तत्वबोध ज्योतिष | ८३ |
| सामुद्रीक शास्त्र | ८६ |

### अद्भुत जादूटोणा

मंत्र, तंत्र, यंत्र यांचीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| इंद्रजाल ( भाग १।२।३ ) | १०२ |
| इंद्रजाल विद्या ( भाग १।२ ) | ८६ |
| गारुड्याचा अद्भुत तमाशा | ८६ |
| गुप्तविद्या १७१ विषय संग्रह | ८८ |
| यंत्रकला प्रकाश | ८१२ |

---

### प्राकृत ग्रंथांतील गोष्टी

| | |
|---|---|
| श्रीरामविजयसार | ८१२ |
| श्रीहरिविजयसार | १ |
| श्रीपांडवप्रतापसार | १८४ |
| श्रीसीतारामचरित्र | १ |
| पांडवचाळिशी | ८१२ |
| साध्वीस्त्रियांचीं चरित्रें भाग १ | ८१२ |
| " " भाग २ रा | ८१२ |
| पतिव्रतासाध्वी स्त्रीचरित्र | ८१२ |
| पुराणांतील नकला ( भाग ६ ) | २०४ |
| हरिदासी नकला | ८१॥ |
| संतलीलामृतसार | ०१२ |
| महासाध्वी द्रौपदी चरित्र | ८८ |

### साधीं नाटकें

| | |
|---|---|
| हरिश्चंद्र नाटक | ८१० |
| श्रीयाळ नाटक | ०१० |
| नरसिंह अवतार नाटक | ८४ |
| वत्सलाहरण नाटक | ०६ |
| पारिजातक भौमासुर नाटक | ०१० |
| प्रमिलास्वयंवर नाटक | ८१० |
| बाणासुर नाटक | ०१० |
| बकासुर नाटक | ०१० |
| बभ्रुवाहन नाटक | ०८ |
| कर्णपर्वदुःशासनवध नाटक | ०८ |
| लवहांकुश नाटक | ०८ |
| चित्रसेनगंधर्व नाटक | ८१० |
| रावणवध सीतांमट नाटक | ८१० |
| सीतास्वयंवर नाटक | ०१० |
| सुलोचना नाटक | ०१२ |
| दक्षयज्ञ नाटक | ०८ |
| अहीमहीवध नाटक | ०८ |
| सीताहरण नाटक | ०८ |
| इंद्रजितवध नाटक | ०१० |
| विराटपर्व कीचकवध नाटक | ०१२ |
| द्रौपदीवस्त्राहरण नाटक | ८१२ |
| रंभाभिसार नाटक | १ |
| कलहपरीणामादर्श नाटक | १॥ |
| श्रीयाळसत्वदर्शन | ८१० |
| भीष्मपर्व नाटक | ०१२ |
| सुरतमधन्वा नाटक | ०६ |
| सुधन्वावध नाटक | ०१२ |
| काळासुर नाटक | ०८ |
| मयुरध्वज नाटक | ०१० |
| आर्यवसुंधरा नाटक | ०१२ |
| चंदनमलयागिरी नाटक | ०८ |
| गोपिचंद नाटक | ०८ |
| विरसेन नाटक | ०१२ |

**पत्ता--- म्यानेजर पुणेंसमाचार,**

**ऑफिस बुधवार पेठ**

**पुण---सिटी.**


---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ..........................८१

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ........................... 4 as

Advertisement
Below 10 lines ....... 2 Rs
Perline over 10 .......4 as
Repetition Per line....3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 19 MAY 1902 NO 19


वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १९ माहे मे सन १९०२ इ० अंक १९

## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरीं
### पेटेंट वाचेस
### नकली मालास भुलून
### पैसे खर्चू नका !!!

रेलवेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्रॅाक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल. ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीम सारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस.........................४०
१९ „ हंटिंग.........................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ...........२५०

### मेटलचें तीन वर्षं ग्यारंटीचें.

रासकॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेंकंद कांट्यासह............२०
१९ „ मध्यभागी सेंकंद काटा असलेलें ..................२२
१९ „ हाफ् हंटिंगचें...............२०
१९ „ हंटिंगचें .....................२०
१४ „ रिस्ट वॉच ... ... ..........२०

### इनगन्‌मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ऑपन फेस............ २०
१९ „ हंटिंग....................२०
१४ „ रिस्टवॉच.....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग........................३५
१८ व १९ „ ओपनफस............३०
१९ „ सेंकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यमागीं सेंकंद कांटा असलेलें ..................३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ...................... ४५

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हॅनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल निनीयन रासकॉप पेटंट वॉचेसचें
सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

---

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

### जाहिरात.

खालील जिन्नस उत्तम प्रकारचे असून ते योग्य किंमतीला आमच्या दुकानीं विकत मिळतील सर्व माल खात्री लायक आहे,

#### पेयें

दर डझनास.

| | |
|---|---|
| सोडा वाटर मोठी बाटली | १ आणे |
| „ लहान बाटली | ३ आणे |
| लेमोनेड मोठी बाटली | ९ आणे |
| लेमोनेड लहान बाटली | ६ आणे |

#### जीन

जिना संबंधी लागणारे सामान जीन, बोल्ट, नट इत्यादि सर्व विक्रीस तयार आहे.

#### तेलें.

१ जिनींग आईल. १ सिलींडर आईल
१ खोबरेल तेल. १ केरोसीन तेल.

#### पट्टे

चामड्याचें पट्टे ३ इंची, १½ इंची, चामड्याची बारीक वादी.

#### चीनी काम.

प्याला रकाबी वगैरे.
एल्युमीनमचा बासण.
गाडीची वरची चरबी.

#### रंग

व्हाईट लेड
व्हाईट झींक
ग्रीन मीस मीनरल
ब्राऊन पेन्ट
टरपेन टाईन वगैरे.

धनजीशा मोटाभाई दारूखानवाला
आणि कंपनी आकोला.

---

नोटीस.

अमृता वल्लद हरी काळे जात कुणबी राहणार चांदनी तालुके बाळापूर जिल्हा आकोला पोष्ट पातुर शेलबाजू. यांस.

खाली सही करणार यांनकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचें स्वतःचे मालकीचे शेत मौजे हिवर तालुके बाळापूर येथील सर्वे नंबर ३८ एकर २३ गुंठे २८ ठिकेचोरमारीचे तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १९०२ इसवी रोजी रकम रुपये ४५० शेला खरेदी मजला दिले आणि खरेदीची रकम तुम्हास पावल्या बद्दल तुम्ही मजला वरील तारखेची पावतीहि रुपये पावल्या बद्दलची लिहून दिली आहे. परंतु शेताचा ताबा तुम्हीं दिला नाहीं. व आतां तुम्ही ताबा देण्याला आमच्याशी बेमानी करिता तर आता तुम्हास नोटिशीने कळविण्यांत येतें कीं तुमचे खरेदीचे रकमेपैकीं मजला १४५८९८६ देणें आहेत ते आज पासून आठ दिवसाचे आंत घेऊन जावे. आणि मजला खरेदी खत लिहून नोंदून द्यावे व शेताचा ताबा द्यावा. या प्रमाणें न केल्यास मजला तुमचेवर ताब्या करितां दिवाणींत फिर्याद करावी लागेल आणि तुमचे पासून शेताचा ताबा कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्च व तुम्ही शेतांतील झाडें व बाभळी वगैरे तोडल्या आहेत त्याची किंमत अजमासे रुपये ५० आणि कोर्टांतून शेताचा ताबा मजला मिळे पावेतो जितकी पिकें तुम्ही घ्याल त्याची नुकसानी, असे सर्व भरून घ्यावें लागेल. म्हणून ही नोटीस दिली कळावे, तारीख १४।५।०२ इसवी.

सही
बनाप्पा माहादाप्पा वाणी
राहणार चांदनी दस्तुर
खुद.

---

नोटीस.

मे० शिकंदर बेग व० हुसेन बेग राहणार नबनेर मोजे पोस्ट चांदूर बिस्वा. ता. मलकापूर. यांस.

खाली सही करणार इनकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे लग्नाचे नवरे असून लग्न होऊन सुमारे १०।११ वर्षे झालीं. तितक्या अवकाशांत तुम्ही ५ वर्षे पर्यंत माझी ने आण करून चांगली व्यवस्था ठेविली होती अलिकडे ५।६ वर्षांत तुम्ही मला मुळींच नेले नाहीं इतकेंच नाहीं तर माझी पर्वा न करितां दुसरे लग्न तुम्ही आपले करून घेऊन सुखानें नांदत आहां. परंतु माझा संसार फुकट चालला या विषयी आपले मनांत काहींच येत नाहीं. असो. तुम्ही मला टाकल्या पासून मी आपल्या बहिणीच्या नवऱ्याच्या आश्रयाखालीं तुमच्या नांवानें सावकाराचे कर्ज काढून, आज सुमारे पांच वर्षे झालीं, काल क्रमणा करीत आहे. मला दरसाल ५० रुपये प्रमाणें २५० अडीचशे रुपय कर्ज झालें. आतां सावकार मला कर्ज मुळींच देत नाहींत करितां नोटीस पावल्या पासून पांच दिवसाचे आंत सावकारांचे पैशाची अदाई करून मला नांदण्यास घेऊन जावें. मी नांदण्यास तयार आहे. अगर मला वागविणें नसल्यास फारकत देऊन मला दुसरा घरठाव करण्यास परवानगी द्यावी असें न केल्यास हीच नोटीस फारकत समजून दुसरा घरठाव करीन. मग आपले नवरेपणाचा हक्क मुळींच राहणार नाहीं व खावटीच्या रुपयाबद्दल व नोटिशीच्या खर्चाबद्दल फिर्याद करून पैसे भरून घेईन. कळावे. ता० १३।५।०२ इसवी.

सही
नुरबी मर्द शिकंदरबेग राहणार
जयपूर ता० मलकापूर तर्फे
मुखत्यार अलीमहमद वल्द
रहिमतखा नायब काजी
रा० जयपूर निशाणी
खुद.

## मोरोपंत

निवडक वेंचे.

( मागील अंकावरून पुढें चालू )

दिव्य-रामायणांतील थोड्या आर्या येथें दिल्या आहेत. यांत बहुधा गूढ अक्षरांची योजना केली आहे.

ताताच्या सत्यातें,
कैकेयीच्याहि हा मना रक्षी
राज्य त्यागी रानीं,
राहे वल्की जटो, फळें मक्षी ११
शोकें शापें राजा,
साकेतीं गेद देह ही सोडी
निंदी कैकेयीतें,
पुत्रश्रीचीच जी धरी गोडी १२

\+ × ×

तों साध्वी सीतेच्या,
दिव्या देहासि दे उटी भव्या
पुष्पांची माळा ही,
कीं जी वाळो नये सदा नव्या १७
सौमित्रीनें केली,
पर्णानीं हे मनोरमा शाळा
कांत- प्रेमें होती,
स्वर्भासादीं तसी घरीं— बाळा २३
तों माया- रम्यांगी,
कामधा रावणं- स्वरा आली
झाली विघ्राणा ती,
कीं सिंहाची कसी शुनी ओली ? २४
रक्षो रीज क्षाम,
मारीचा राक्षसा पुढें प्रेषी
तो ही तैंत्रिर्वधें,
झाला स्वर्णेण सज्जन द्वेषी २६
सीता त्यातें पाहे,
प्रार्थी स्वामीस तो धरायाला
धन्वी मागें लागे,
देवांचें वांछिलें करायाला २७
त्यातें रामस्वामी,
दूरारण्यांत मार्गणें ताडी
हा सीते ! हा बंधो !
हे फोडी हाक तो भ्रमीं पाडी २८
झाली सीता भीता,
वीरा वीरा ह्मणे पाति— प्राण
रक्षीं; लक्षीं धर्मा;
साधो ! बाधो न मी; करी त्रीण २९
[१९] तो प्रार्थी माते! हे,
रक्षोमाया न हाक आर्याची
[२२] श्री त्या गांजी ठाया,
शक्राच्या शीघ्र सिद्धि कार्याची ३०
बोले ती जा पापा,
सोडी दुःखार्ते तोहि शाळेतों[२३]
तों ये कामी क्रोधी,
लोभी ने शीघ्र भूमि- बाळेला ३१
मेटे भ्राता भ्राया,
सांगे संताप जो मना झाला
त्याला दुश्चिन्हें हीं,
श्रीराम क्षिप्र आश्रमा आला ३३
शून्या शाला पाहे,
खगांच्या श्रीश रीतिनें वाहे
बोले वाणी हा! हे,
प्राणी कोणी न शोक तें साहे ३४

वि. आ. का.

---

१ रामचंद्र. २ वल्कलें धारण करणारा. ३ जटाधर. ४ अयोध्येंत. ५ पुत्र भरत आणि संपत्ति. ६ अनसूया. ७ लक्ष्मणानें. ८ रामंदि [?]. ९ सीता. १० शूर्पणखा ( रावणाची बहीण ) ११ कुत्री. १२ सखी १३ रावण. १४ रावणाच्या आज्ञेनें. १५ सुवर्ण—एण सोन्याचा हरीण. १६ धनुर्धारी. १७ बाणानें. १८ रक्षण. १९ लक्ष्मण. २० राक्षसाचें कपट. २१ रामाची. २२ सीता, २३ पर्ण शाळेला. १ स्त्री लंपट.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध १२ शके १८२४

---

एक चमत्कारिक वाद येथील नदीच्या पाण्याच्या संबंधानें निघाला आहे आणि त्या वादामध्यें अकोल्याच्या लोकांना पाण्यासंबंधानें मोठा त्रास सोसावा लागत आहे. आकोल्याची मोर्ना नदी ही अगदीं सामान्य आहे, आणि तिचा पाण्याचा प्रवाहहि पुष्कळ ठिकाणीं खंडलेला असतो. पयोष्णी सारख्याहि नदीच्या पात्रामध्यें ठिकठिकाणीं खड्ड दृष्टीस पडतात. तेव्हां मोर्ना नदीची ती काय कथा ! सुमारें वीस पंचवीस वर्षामागें आकोल्यास पाण्यासंबंधानें लोकाचे फार हाल होत असत, त्यावेळच्या नदीच्या पात्रातील काहीं विहिरी अद्याप विद्यमान आहेत. या विहिरी पासून होणाऱ्या पाण्याचा पुरवठाहि फार क्षुद्र असे या वेळच्या मानानें हल्लीं पाण्याचा पुरवठा चांगला आहे. गेल्या दुष्काळांत नवीन विहिरी पुष्कळशा खणण्यांत आल्या आणि जुन्या विहिरींच्या पाण्याचा खजिनाही मोठा करण्यांत आला. या शिवाय नळाच्या पाण्याची सोय थोडी बहुत तरी उपलब्ध आहेच. ही गोष्ट विसरतां कामा नये कीं, गेल्या वीस पंचवीस वर्षांत लोकवस्ती विस्तृत झाली व त्या मानानें पाण्याची जरूरीहि विशेष वाढली. साधारणपणें ही आकोल्याच्या पाण्याची रडकथा झाली. येथील नदीच्या पाण्याचा साठा हा उत्कृष्ठ तऱ्हेनें राखण्याची तजवीज गेल्या १५–२० वर्षां पासून चालूं आहे. ही तजवीज कै. कर्नल फिटझरल्ड यानीं मोठ्या परिश्रमानें करून ठेविली आहे. या तजविजी बद्दल सर्व आकोलेकर त्यांची नेहमीं आठवण करीत असतात. आणि येथील मुनसिपालिटीहि चांगला बंदोबस्त ठेवून लोकांकडून पाण्याचा मितव्यय करवीत असे आणि लोकाहि या रीतीनें पाण्यासंबंधानें सुखांत असत. गांवाच्या वरच्या व खालच्या भागाला दोन अनिकट बांधून पाणी अडवून सांठविलें आहे, आणि हें पाणी अनिकटच्या निरनिराळ्या द्वारांतून अशा व्यवस्थितपणें सोडतात कीं, पाणी न नासतां लोकांचा उपयोग अधिक व्हावा. यंदा ही व्यवस्था मोडण्यांत आली आहे, पण ती कां मोडली व कोणी मोडली याबद्दल आह्मांपाशीं समग्र माहिती नाहीं, तथापि नदीचें पाणी वरच्या अनिकटांतून खालीं सोडण्यांत येत नाहीं व त्या पासून लोकांचे फार हाल होतात ही गोष्ट आह्मी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेस मुद्दाम आणूं इच्छितों.

आतां वाद असा पडला आहे कीं, वरच्या अनिकटांतील पाणी गांवच्या लोकांच्या उपयोगासाठीं सोडणें किंवा न सोडणें ही गोष्ट सरकारच्या खुषीची आहे. आणि मुनसिपालिटीला या बाबतींत सरकारी मर्जी विरुद्ध कांहीं हात घालतां येत नाहीं. दोन अनिकटामधील नदीचें पात्र बहुतेक कोरडेंच आहे, आणि ठिकठिकाणीं पाण्याचीं डबकीं दृष्टीस पडतात, तीं रोग उत्पन्न करण्याला कारणीभूत होतील अशी मोठी भिती आहे. वरच्या अनिकटांतून पाणी सोडल्या शिवाय गत्यंतर नाहीं. आणि तें पाणी सोडण्याला मुनसिपालिटी उद्युक्त असून येथील डेपुटी कमिशनर आणि सिव्हिल सर्जन मुनसिपालिटीला तसें करण्या बद्दल मनाई करीत आहेत. सार्वजनिक उपयोगासाठीं अनिकट बांधून जी उत्कृष्ठ व्यवस्था कर्नल फिटझरल्ड साहेबांनीं केली तिचा दुरुपयोग हल्लीं बेधडक होत आहे या बद्दल आह्मांस मोठी दिलगिरी वाटते. इतकीं वर्षें म्युनसिपालिटी जी पाण्याची वांटणी करीत आली ती मोडून टाकण्याचा अधिकार एकदम कसा पोचतो हें आह्मांस कांहींच उमगत नाहीं. वरच्या अनिकटावरील पाणी कां सोडूं देत नाहींत याचें खचित कारण बाहेर आलेलें नाहीं. तरी ज्या अर्थीं म्युनसिपालिटीचे सभासद पाणी सोडण्यास उद्युक्त आहेत त्या अर्थीं ते ही गोष्ट पूर्ण विचारानेंच करीत असतील असें अनुमान बांधण्याला इतके वर्षांचा अनुभव कांहीं कमी आहे असें वाटत नाहीं. नदीचें पाणी नित्याच्या उपयोगांत घेण्या लायक नाहीं असा वास्तविक प्रकार असतां तर म्युनसिपालिटीच हें पाणी सोडण्यास प्रतिकूळ झाली असती असें आह्मांस पक्कें वाटतें. अनिकटावरील पाण्याचा सांठा नावेंत बसून मौज करण्याला उपयोगी पडतो, किंवा त्या मध्यें पुष्कळशा मच्छांचें जीवन उत्कृष्ट होतें, किंवा हा सांठा दृष्टीस मोठा आल्हाद देतो एवढ्याच साठीं सार्वजनिक कार्याला हें पाणी सोडूं नये असें आमचे सिव्हिल सर्जन साहेब ह्मणतील असें आह्मांस वाटत नाहीं. डाक्टर रेली साहेब यांच्या हातीं सर्व गांवचें आरोग्य राखण्याचें काम आहे तेव्हां ते अल्पसल्प कारणावरून नदीच्या पाण्याचा सांठा लोकांच्या उपयोगीं पडूं देणार नाहींत असें ह्मणवत नाहीं. जर अनिकटाचें पाणी खरोखरीच खराब व निरुपयोगी असेल तर तें तसेंच ठेवण्यांतहि अर्थ नाहीं. कारण तें तसेंच ठेविल्यानें वरील गांवच्या लोकांस फार उपद्रव होईल. चांगलें पाणी असेल तर (व तें चांगलेंच आहे.) तें योग्य वेळीं सोडीत गेल्यानें लोकाचा मोठा फायदा होईल. नदीच्या पाण्यावर सर्व लोकांचा सारखा हक्क आहे. आणि तें कांहीं विविक्षित गोष्टी साठींच अडवून ठेवण्याचा हक्क सरकारास बिलकूल पोचत नाहीं. शिवाय असें करण्यानें एक मोठा तोटा होत आहे. अनिकटा खालील आकोल्याचा भाग व या शिवाय नदीच्या खालच्या भागावरील खेडीं यांना मोठा त्रास सोसावा लागणार आहे. नदींतील झरे हें पाणी न सोडल्यामुळें वास्तव कोरडे पडत आहेत. आणि त्यामुळें नदीच्या खालच्या भागांत झऱ्यांना पुष्कळ खोल पर्यंत पाणी लागत नाहीं. एकूण सध्यांच्या चालूं प्रकरणाचा निकाल लवकर लागला पाहिजे. पण तो तसा लवकर लागण्याचा रंग दिसत नाहीं. आमच्यामतें ही गोष्ट अखेरच्या निकालास लागेपर्यंत पूर्वापारची मामुली व्यवस्था अमलांत आणावी. ह्मणजे चालू कार्यक्रमाला अडथळा येणार नाहीं. आणि उन्हाळ्याचे हाल दूर होतील.

---

गेल्या अंकीं औद्योगिक परिषदे संबंधानें आह्मी कांहीं विचार प्रगट केले आहेत. त्या मध्यें आमचा मुख्य आग्रह इतकाच आहे कीं, कोणत्याही औद्योगिक मंडळींनीं हजार गोष्टीं हातांत घेऊं नयेत. आणि एखाद्याच विविक्षित गोष्टीचा पाठपुरावा चांगला जोरानें करावा ह्मणजे यशश्री मिळेल आणि मंडळीची कार्यमाला चांगली अस्तित्वांत येईल. लक्ष दोन लक्षांच्या भांडवलात फार मोठीशीं कामें होत नसतात. व्यक्ती मात्राच्या दृष्टीनें हें भांडवल मोठें दिसेल परंतु प्रस्तुत कार्याचा मोठपणा लक्ष्यांत घेतला ह्मणजे हें भांडवल फार क्षुद्र वाटेल. आमच्या दृष्टीनें ही औद्योगिक मंडळी देशी कपडा व देशी वस्तू यांचीच चळवळ हातीं घेईल तरी ती पुरेशी होईल. उत्तरोत्तर देशी मालासंबंधानें लोकांचा अनुकूल ग्रह होत चाललाच आहे आणि देशी माल वापरण्यांत एक प्रकारचा अभिमान आहे असाहि प्रवृत्तीचा जोर दिसतो. या प्रवृत्तीचा लाभ करून घेण्याची संधी हीच आहे. सामान्य कुटुंबाच्या गरजा ज्या देशी मालानें भागतात तोच माल उत्पन्न करण्याच्या खटपटीला आपण प्रथम लागलें पाहिजे. आणि अशाच कार्याकडे आकोल्यास स्थापित झालेली मंडळी आपली दृष्टी वळवील असा आह्मांस भरंवसा आहे. या प्रकरणांत कोणत्या बाबतीची चळवळ पाहिजे याचें दिग्दर्शन औद्योगिक मंडळीच्या एका प्रमुख चालकानें केलें आहे. तें दिग्दर्शन अंजनगांवा संबंधानें आहे. या गांवीं एकंदर माग बाराशें आहेत. त्या पैकीं चारशे मागांचे पन्नास मालक स्वतांच्या भांडवलावर सुधारणा करण्यासारखे आहेत. बाकीच्या ८०० मागांचे मालक ४५० आहेत. या कोष्टी लोकांस पैसा देऊन माग तयार करवावे लागतील. व तो पैसा त्यांच्याकडून तयार करविलेल्या मालांतून वसूल करून घ्यावा लागेल. पण कांहीं कोष्टी इतके दरिद्री आहेत कीं त्यांच्या जवळ माल तयार करण्यास पैसाहि नाहीं व पैसा दिल्यास त्यांना कोणी जामीनही मिळणार नाहीं. अशा लोकां करितां एक कंपनी स्थापून त्यांचे माग उभे करून द्यावें लागतील व त्या लोकांस मजुरीनें काम द्यावें लागेल. व ही मजुरी रोजावर

न ठरवितां कामावर ठरविली पाहिजे. या प्रमाणें कंपनी उभारून कोष्टी लोकांस सर्व प्रकारचें सूत पुरविलें पाहिजे आणि तयार झाले ला माल प्रसंग विशेषीं विकत घेण्याचीही व्यवस्था केली पाहिजे. या शिवाय चालू मागांत नवीन सुधारणा करण्याची गोष्ट निराळीच आहे. आणि ती सुधारणा क्रमाक्रमानें व खर्चविचाराच्या धोरणानें प्रचारांत आणावी लागेल. अशा प्रकारच्या गोष्टी निव्वळ द्रव्यावर दृष्टी ठेवून होत नसतात. हजारों लोकांचा निर्वाह चालेल ह्मणून परकल्याणाच्या दृष्टीनेंच अशा गोष्टी केल्या पाहिजेत. नुसत्या अंजन गावांत कमीतकमी पाच पासून दहा हजारापर्यंत भांडवल गुंतलें जाईल. जी अंजनगांवची गोष्ट तीच बाळापूरची, आकोटची व इतर जुन्या कारागिरीच्या स्थळांची होय. देशी वस्तू उत्पन्न करण्याचा कार्यक्रम आह्मी औद्योगिक मंडळी पुढें मांडीत आहों. आणि या उल्लेखाचा हेतु इतकाच कीं त्यांनीं हाच क्रम प्रथम उचलावा आणि नवीन कार्यशक्ती येई पावेतों दुसऱ्या गोष्टींच्या नादीं पडूं नये.

---

## The Berar Samachar

MONDAY MAY

19 1902

We shall be surprised if Berar be ever restored to His Highness the Nizam. In all probability the province will be retained by the paramount power. The administration of the last fifty years has taught the British people that the possession of this province is of inestimable value for more reasons than one. The province is like a beautiful garden that borders on the North of the Maharashtra. It occupies a central position in the whole of India. It is important for the commercial intercourse which it promises to develop. The possession of the province is also important as a key to the net work of so many railways in India. The progress and prosperity of the province has been the attractive feature of the British administration, and it is no small loss to forgo the possession of such a fertile and excellent province in favour of His Highness the Nizam. Justice [illegible] and simple demands that the province should be restored without the slightest hesitation. There should be no aye or no as to the right reply about the present question of restoring the province to its proper owner. In all honesty of purpose the question admits of no alternative reply. It is but proper that the Nizam should insist upon the rendition of Berar. It is an ancient heritage and a wise man will lose every thing before he loses such an estate. But to a plain mind practical politics is a riddle. Circumstances will conspire to force the Nizam to adopt a particular course of conduct. The proposal of the British Government will in fact be a request of the Lord. The proposal will have all the grace of a request whereas it will contain in it the elements of a supreme command. Numbers of such proposals are already [illegible] the public. We have discussed them in our Marathi columns and we need not go on the same grounds over again. In all moral certainty the province will not be ceded to the Nizam's dominions. We do not believe in the plausible arguments which the Hon'rable the Resident at Hyderabad has advanced for the approval of the Nizam. There is no prestige lost or gained in having the British Government as a lessee. A lessee is as good a lessee whether he be A or B or a pre eminent state in the world if the solvency of the lessee is sufficiently guaranteed. We presume that if the Nizam admits of a proposal of a permanent lease and accepts an annuity of some lacs of rupees, His Highness will be doing an act which could not be avoided without incurring the sovereign displeasure. It is better to continue the present arrangement than to run the risk of entering into a permanent lease. We know that the new proposal holds forth a promise of a more substantial gain in gold, but there is more honour and dignity in retaining at least the present system of administration because it gives the Nizam a chance of controlling the finances of this province. The present time might not be very favourable for the restoration of the province and if the question be left undecided now there will come a time when the Nizam will move in the matter most favourably to himself. The postponement of the present problem will land us into a region of hopes in stead of utter dispair. It is immaterial for us if the province be restored to the Nizam or be retained by the British Government. In the first case we shall form an honourable addition to the Nizam's dominions and shall be setting a worthy example of model administration for the acceptancee of the primeval native state. In the latter case it will be more advantageous to us to form an adjunct of a British presidency than to remain a detached province with a costly administration. We are, however, very much in favour of a restoration because it would be in consistancy with good faith and it will be in perfect harmony with the duties of a trust which was committed to the care of the greatest nation of the world.

---

Her Highness the Rani Sahib of Gondal is an accomplished lady. She is a globe-trotter and seems to have made a nice use of her experiences of the people of so many nationalities. She has kept an excellent diary of her travel. We quote the following para from her dirary which gives an attractive description of the people of different nations:—

" She deems Englishmen adventurous, industrious and courageous, but rather reserved in their habits. In her estimation the Scotchmen are brave, frugal and gifted with a literary taste. The Irishmen she considers civil but hasty. In her opinion, the Frenchmen are luxurious and tidy, but a little proud and easily excitable, the Germans good and serious, but rather strict, the Russians patient and bold the Norwegians good and frugal, the Swedish worthy of becoming learned but dull, the Danes peace-loving and strong but oblivious of their ancestral spirit of adventures the Dutch are hardened and persistent, the Swiss simple and patriotic, the Italians are fine—looking and skilful; but dirty, indolent and sharpwitted the Spaniards and Portuguese are lazy, and supercilious as also filthy, the Turks are hospitable, devoted to their religion, but idle and devoid of learning, the Americans industrious, admirers of liberty, and frugal, but haughty, the Chinese are very industrious and skilful but uncleanly. The Japanese, says our author, are not so uncleanly, but are more active and enterprising. Lastly, she thinks the Australians to be meek but uncivil and overconscious of their own ability.

---

## वऱ्हाड

हवामान— वारा सोसाट्याचा सुटतो. मधून मधून अभ्रें येतात. दिवसा ऊन चांगलें तापतें, तरी रात्रीं थंडावा लवकर येतो. दरसाल प्रमाणें यंदा उष्मा हे ऊन शिजल्या सारखें अद्याप होत नाहीं. कांहीं अनमान बांधतात कीं, यंदा पावसाळ्याला सुरवात लवकर होईल; पण कांहीं जणांचा तर्क याच्या उलट आहे. यंदाचे हवामानच विलक्षण आहे. सार्वजनिक आरोग्य असमाधानकारक नाहीं. खामगांवास तुरळक प्लेगामुळें मृत्यू होतात तथापि एकंदरीनें शांतताच आहे.

मे. कोलंब, डेपुटी कमिशनर, उमरावती हे मे० ग्योरट साहेब यांस चार्ज देऊन रजेवर विलायतेला गेले आहेत.

मे० निजामुद्दीन साहेब डेपुटी कमिशनर हे परत वऱ्हाडांत येऊन यवतमाळच्या डेपुटी कमिशनरींच्या जागीं दाखल झाले.

रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे आ. ए. अ. क. आकोला यांच्याकडे बाळापूर, आकोला आणि आकोट या तीन तालुक्यांची मुलकी तालुका आफिसरी देण्यांत आली आहे.

खानबहादूर शेर महमदखान तहशिलदार वाशीम हे रजेवरून परत जातांना आकोल्यास मित्र मंडळींच्या भेटी साठीं मुद्दाम आले होते

आकोला मुनसिपालिटी अवेळींच कृपणपणा करिते. हल्लीं गटारें चांगलीं धुतलीं न गेल्यामुळें दुर्गंधी फार सुटते व हवा रोगट होण्याची फार भिती आहे.

उमरावतीस गेल्या ९ वे तारखेस श्री शिवजयंतीचा उत्सव फार नामी झाला. या उत्सवासाठीं दीड दोन हजार लोक जमले होते. उपदेशपर पद्यें गाण्यांत, सुंदर व्याख्यानें देण्यात, व पुराण सांगण्यांत, सर्व मंडळींचा काल मोठ्या आनंदानें गेला. श्रीमंत शिवछत्रपती हे ईश्वरी अंशाचे होते व त्यांचे अंगीं अलौकिक गुण होते या संबंधानें सर्व जणांच्या विचाराची एक वाक्यता दिसली. श्री शिवजयंती हा राष्ट्रीय उत्सव आहे आणि ह्याच्या प्रत्यक्ष दर्शनानें आपल्या अंगीं देशाभिमानादि उज्वल गुण पुनः उदय पावतील अशी आह्मास पूर्ण आशा आहे.

---

### नोटीस

बेशमी— बनसीलाल गफूरचंद व रामचंद्र परशराम साहू दुकान पेठ मूर्तिजापूर या उभयतांस.

या जाहिर लेखानें खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं मौजे हेंडज परगणे हातगांव तालुका मूर्तिजापूर येथील सर्वे नंबर २६ या शेतांत माझा निम्मा हिस्सा आहे आणि निम्मा हिस्सा खातेदार मारुती वलद विठोबा नाईक याचा आहे. आह्मी उभयतां हिस्सेदार आपापल्या हिश्याचा उपभोग कदीम पासून समाईकींत घेत आहों. शेताची वहिवाट समाईकींत होत असून उत्पन्नांतून ज्याच्या त्याच्या हिश्याची वाटणी होत असते. हल्लीं मला असें समजतें कीं सदहू खातेदार मारुती यानें मला न विचारतां चोरून सर्व शेत तुह्मा दोघाजणांस खरेदी दिलें आहे. तुह्मी त्याच्या लबाडीला मदत करून त्या खरेदीच्या जोरावर दांडगाईनें सर्व शेताचा कबजा करण्याच्या विचारांत आहां. दांडगाईनें श्रीमंतीच्या जोरावर जबरीचा कबजा तुह्मी करण्यास याल तर मी तुह्मास तसें करूं देणार नाहीं. तुह्मावर फौजदारी करून तुमच्या दांडगाई बद्दल सरकार मार्फत जाब घेतला जाईल. तुह्मी दिवाणी मार्फत शेतीचा कबजा करावा.

मारुतीला माझा निम्मा हिस्सा विकण्याचा अधिकार नाहीं. माझ्या हिश्या संबंधानें मारुतीनें दिलेलें खरेदीखत रद्द आहे. मारुतीचा हिस्सा प्रथम विकत घेण्याचा अधिकार माझा आहे. या अग्रक्रयाच्या अधिकारा प्रमाणें निम्या हिश्याची वाजवी किंमत मी देण्यास तयार आहे. सारांश, शेताचा कबजा मी तुह्मांस कोणत्याही रितीनें करूं देणार नाही. या नोटिशीनंतरही तुह्मी कांहीं जबरदस्तीचा प्रकार कराल तर दिवाणी व फौजदारी होऊन सर्व नुकसानी तुह्मावर पडेल. कळावें. तारीख १८ मे १९०२ इ.

सही

सहीची निशाणी नागोसा वा रतनसा तेली राहणार मुर्तिजापूर याचे हातची असे.

---

## जाहिरात

तमाम लोकांस माहित होण्यासाठीं प्रसिद्ध करण्यांत येतें कीं जनावरांच्या रोगाचे इलाजा करितां, गत वर्षाप्रमाणें तारीख १ ली एप्रिल १९०२ पासून जळगांव, मोर्शी, पुसद, मेहकर, दर्यापूर आणि वणी ह्या तालुक्यांना व्हेटरीनरी असिस्टंट्स् ( जनावराचे डाक्टर) नेमले असून ते घोडे, गायी, बैल, ह्मशी कुत्रें इत्यादि ग्राम्य पशूंच्या रोगांची पारख नीट करतील. या साठीं ज्या ज्या लोकांना जरूरी असेल त्यांनीं त्यांनीं सदहू संस्थांचा जितका उपयोग करून घेतां येईल तितका फायदा करून घ्यावा. ह्या दवाखान्यांत औषधोपचार मुफत केले जातील. कळावें. तारीख १८ मे १९०२ इ०

E. Marshall.

इन चार्ज, ऑफिस ऑफ डायरेक्टर ऑफ लँड रेकर्डस् आणि ॲग्रिकल्चर.

---

## वर्तमानसार

विजेचा सांपळा– एका जर्मन शोधकानें उंदरांस पकडण्याचा विजेचा सांपळा तयार केला आहे. आमिष खाण्यास उंदीर गेल्याबरोबर २ आंकड्यांत उंदीर सांपडतो व तावडतोब मरतो.

गोमुखांतून विनंति लेख:– नागपूरची गोरक्षिणीसभा संगमरवरी दगडाची एक गाय करून तिच्या जिभेवर एक विनंती लेख लिहून ती गाय राज्यारोहण समारंभाचे वेळीं विलायतेस धाडणार आहे.

राणीच्या कविता— जपानच्या राणी संगीत कलेंत फार निष्णात आहेत. यांना कविता करण्याचा नाद आहे. त्यांनीं केलेली कविता राष्ट्रीय समजून सध्या या देशांतील सर्व शाळांतून शिकविल्या जात आहेत.

हर्षवायूनें मृत्यु– पारिस शहरांतील एक छोटेसें दुकान लावणाऱ्या एका विधवा बाईला सोडतींत ७६००० रुपये मिळाले. या आकस्मिक दैवयोगाचा या बाईला इतका अतिशय आनंद झाला कीं, तें आनंदाचें पत्र वाचतां वाचतांच तिला हर्षवायु होऊन खुर्चीच्या खुर्चीवरच तिचें प्राणोत्क्रमण झालें !

सूचना—प्रिव्ही कौंसिलचे एक सभासद व प्रसिद्ध सरदार घराण्यांतील वंशज लॉर्ड स्टॅन्ले ऑफ आल्डर्ले यांचे मनांत राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होण्याचें आहे. यांचे मनांतील हिंदुस्थानाविषयींची सहानुभूती नुसती तोंडांतच नसून कृतींतही आहे. प्रसिद्ध चप्रा प्रकरणामधील आरोपी नरसिंहसिंग यास यांनीं १९०० रुपयांची देणगी दिली होती. हाउस ऑफ लॉर्ड्समध्येंही हिंदुस्थानचा कैवार घेण्यास ते सदैव तयार असतात; या साठीं अहमदाबादच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष यास नेमावें, अशी एका गृहस्थाची सूचना आहे.

महाकल्पक— रस्ते स्वच्छ राहण्याला पाण्या ऐवजीं तेल शिंपडावें असें ब्रह्म देशच्या डेपुटी कमिशनरांनीं ठरवून त्याप्रमाणें करूनही पाहिलें म्हणतात. सोन्या रुप्याच्या मुलाम्याचे रस्ते केल्यास इंद्रभुवना पेक्षांही उत्तम होतील. एक वार तरी करून पहावेंच !

पाऊस पाडण्याचा शोध— जपानांतील एका पंडितानें विद्युत्साह्यानें पाऊस पाडण्याचे कलेचा शोध केला असून त्याचे त्या शोधाचे ३४ प्रयोग तिकडे नुकतेच झाले व शोध निर्दोष आहे असें सर्वांशी शाबीद होऊन चुकलें आहे. विजेचा पर्जन्याशीं फार च निकट संबंध असून तिची शक्ती फारच मोठी असल्यानें तिचा वेग मेघमंडळाकडे केल्यास फार लांबचे ढग जवळ येऊन एकत्र होतात व ढगास विजेनें गती मिळतांच प्रथम गारांच्या व नंतर पाण्याचे रूपानें पर्जन्य पडतो जपानांतील विद्वज्जनापुढें हा प्रयोग सुरू झाल्या पासून २४ तासांनीं पर्जन्यवृष्टी झाली असें म्हणतात पाऊस पाडण्याचीं चिन्हें नसतांना हा प्रयोग मुद्दाम केला असल्यानें ती क्रिया या समयीं बरीच साध्य झाली आहे असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

एक अनिष्ट भविष्य— एशियाटिक कॉर्टरली रिव्ह्यूत असें स्पष्ट म्हणण्यांत आलें आहे कीं, इ. स. १९०२ साल हिंदुस्थानचे इतिहासांत भयंकर दुष्काळाविषयीं गाजणार आहे. हें भविष्य अनिवार्य खोटें होवो व सर्व जन सुखानें नांदोत !

विलक्षण गुण– स्पेनमधील टिन्टी नदीच्या पाण्यांत असा कांहीं गुण आहे कीं तींत दगड टाकल्यास तो दुसऱ्या दगडाशीं मिळून एकरूप होतो. या नदींत मासे बिलकूल नाहींत. हा काय चमत्कार असावा बरें !

नवीन शोध—डा० कालटीझ नांवाच्या एक शास्त्रज्ञानें एक पदार्थ शोधून काढला आहे, तो पाण्यांत टाकला म्हणजे तें मिश्रण राकेल तेलासारखें होऊन त्याच्या दिव्यापासून त्या तेलापेक्षां दुप्पट मोठा उजेड पडतो; आणि राकेला प्रमाणें एकदम भडकून जाण्याचा दोषही त्यामध्यें मुळींच नाहीं. मातीच्या तेला ऐवजी हेंच सर्वत्र वापरण्यांत येईल तर फार चांगलें होईल.

कैदी सोडणार— आपले राजेसाहेबांच्या राज्याभिषेकाचे दिवशीं सर्व ब्रिटिश राज्यभर कैद्यांची शिक्षा भोगीत असलेल्या अपराधी लोकांना एकदम सोडून दिलें जाईल असें म्हणतात.

राकेलनें क्षय होतो— हिंदुस्थानांत क्षय रोगाची वृद्धि दिवसेंदिवस जास्त होऊं लागली आहे याचें कारण गोरगरीब लोकांच्या घरांत राकेल पिसाळलें हें आहे, असें एका डाक्टराचें म्हणणें आहे. गरिब लोकांच्या घरांत हवा खेळत नाहीं; ह्यामुळें राकेलचें काजळ घरांत साचून त्याचा परिणाम त्याच्या शिरांवर होतो असें म्हणणें आहे.

नवीन पिस्तुल— अमेरिकेला एका शोधकानें प्रत्येक सेकंडाला दोन गोळ्या दोनशे यार्डांवर अत्यंत जोरानें व नेमानें मारणारें ल्यूगर्ड नांवाचें नवीन पिस्तूल बनविलें असून त्याचे नमुन्याचीं हजार पिस्तुलें आपल्या घोडेस्वारांचे एका पलटणीला देण्याचेंही अमेरिकन सरकारानें ठरविलें आहे.

दीर्घायुष्याची किल्ली— नेहमीं कामधंदा करणाऱ्या माणसाचें आयुष्य अधिक असतें. रिकाम्या माणसाचें आयुष्य कमी असतें. वाकिलीचा धंदा करणारे व डाक्टर हे कमी दिवस जगतात. शेतकरी लोक अधिक दिवस जगतात. एकूण सतत उद्योग हीच अमृतवल्ली होय.

---

नोटिस.

मे. शेकमहिदु वा। शेककरीम. मुसलमान. बस्ती मौजे लाखनवाडा ता. बाळापूर जिल्हा आकोला. पोस्ट—खामगांव यांस.

खाली सही करणार याजकडून नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं आमचे स्वतःचे मालकीचे शेत मौजे लाखनवाडे येथील टिके चिचीवालें तुम्हांस मागे गेल्या पौष महिन्यांत २९० रुपयास खरीदि दिलें. रुपये देण्याचा करार ८–१२ दिवसाचा तोंडी झाला. व करारा नंतर कांहीं दिवसांनीं तुम्ही रोख रुपये १० व गाडी असें आजमास शंभर रुपये देण्यास आला असतां मी ते नाकबूल केलें म्हणून गाडी व रुपये १० तुम्ही कडापा वाणी यामपासीं बरवर ठेविली या सर्व कृत्यास आतां चार महिने होत आलें. अद्याप रकमेचा पता नाहीं तर या नोटीसीनें तुम्हास कळविले जातें कीं तुम्ही ही नोटिस पावल्या पासून चार दिवसाचें आंत आमची पूर्ण रकम रुपये २९० चुकते करून देणे व रकमेचें व्याज खरेदिचे तारखेपासून माझे पदरांत रकम पडेपावेंतो दरमहा दर शेकडा दोन रुपये प्रमाणें देणें व खरेदीखताचा खर्च तुम्ही केलेल्या करारा प्रमाणें तुमचे जवळचा करून खरेदिखत कायदेशीर करून घेणें. या प्रमाणें न केल्यास मी दुसऱ्यास शेत विकून टाकीन व या नोटिशीचा खर्च तुमचे जवळून घेईन. ही नोटीस दिली तारीख ११-५-१९०२ ई.

सही.

पंच्याक्षरीआपा गु. विरुपाक्ष

द. खुद.

---

नोटीस

मारोती भट बिन विठ्ठल भट जोशी राहणार मौजे एकलार तालुका आकोला पोष्ट दहिहांडा यासः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं आपण दोघे सख्खे बंधु आहों. आपले वडील जिवंत असतांनाच आपले दोघाचे जमत नसल्यामुळें आपण वेगळे राहिलों, परंतु वडिलोपार्जित जिनगिची वाटणी त्या वेळीं झाली नव्हती. आज उद्या वाटणी करून घेऊ असें म्हणता म्हणता सात आठ वर्षे होऊन गेलीं. आतां आपल्या मनांतला अंतस्थ बेत कांहीं निराळाच दिसतो. माझा हिस्सा मला न मिळावा असें आपलें मनांत वागत असल्यावरून ही नोटीस देणें भाग पडले.

वडिलोपार्जित जिनगिची यादी खालीं लिहिल्या प्रमाणें.:—

| सर्व्हे नंबर | एकर | आकार रुपये |
|---|---|---|
| ८६ पैकी | ६४१८ | १३ |
| ३० | १४०३ | २९ |
| ७४ | २१४२६ | २५ |

१ घर राहण्याचे धाब्याचे खांब १२ तसमे साहा वर माडी कवेलूची पुढें वसरी कवेलूची.

वृत्तीचीं गावें.

१ एकलार, २ कपलेश्वर, ३ रोहन, ४वडद ५ कौलखेडे, ६ गोनापूर, ७ आपोतीलहानी

तांबे पितळीचीं भांडीं यांची आकार किंमत रुपये ५०, चांदी तोळे ६०, सोने वजन तोळे ९.

वरील जिनगीचा निमे हिस्सा माझा मला मिळाला पाहिजे. ही नोटीस पोहोचल्यापासून आठ दिवसाचे आंत चार संभावित पंचा समक्ष वाटणी पत्रक करून त्या प्रमाणें ज्याचा माल त्याच्या ताब्यांत द्यावा. असें न करितां वरील जिनगीची कांहीं अफरा तफरा केल्यास सरकारांत दाद मागावी लागेल. व अखेर निकाल होईपर्यंत सर्व खर्चवेच तुम्हापासून भरून घेतला जाईल. कळावें तारीख १६।५।१९०२ इसवी.

सही

अंबादासभट बिन विठ्ठलभट जोशी

राहणार वडद दस्तुर खुद्द.

---

नोटीस.

बेशमी शिवराम अण्णाजी मऱ्हाठा अहीर राहणार टिटवे परगणे पिंजर ता. आकोला पोस्ट—बारशी टाकळी. यांसः–

मी, खालीं सही करणार या लेखानें कळविते कीं तूं माझा लग्नाचा नवरा आहेस पण गेल्या दुष्काळा पासून तूं मला सोडून दिलेस. त्यास आज ३ वर्षे झाली. तुझे मनांत मला नांदविण्याचें दिसत नाहीं. म्हणून कळविते कीं, तीन वर्षाच्या माझ्या पोटगीबद्दल अंदाज रुपये १५० मला देऊन लेखी फारकती द्यावी. या गोष्टीचा निकाल करण्यासाठीं तुम्हाला आठ दिवसांची मुदत दिली आहे. या मुदतींत रुपये व फारकती न आली तर मला सरकारांत दावा करावा लागेल व जो खर्च होईल तो सर्व तुजपासून घेतला जाईल. शिवाय हीच नोटीस फारकती समजून मी दुसरा घरठावहि करीन मग मजवर तुझा कसलाही हक्क राहणार नाहीं. ता. १६ मे सन १९०२ इसवी.

सहीची निशानी

सावित्री मर्द शिवराम अहीर

राहणार टिटवे प्रगणें पिंजर

हिचे हातची बांगडी.

---

नोटीस.

बेशमी सखाराम हणगूजी जात कुणबी गावंडे राहणार टिटवे, परगणे पिंजर, तालुका आकोला पोस्ट बारशी टाकळी यांसः–

मी खालीं सही करणार या लेखानें कळविते कीं, मौजे टिटवे येथील माझे राहते घरांत मी सुखानें व कोणाच्या भानगडींत न पडतां दिवस काढते असें असता तुम्ही शेजारी म्हणून मला मदत करावी पण उलटा आपण मला फार त्रास देत आहा व या त्रासामुळेंच मला ही नोटीस देणें भाग पडलें. सुमारे एक दोन महिन्यापासून तुम्ही माझ्या घरांत जबरदस्तीनें शिरून माझी भांडीकुंडी बाहेर फेकून देतां हें करणें फार वाईट होय. असो. या उप्पर माझ्या घरांत आपण पाय घालूं नये. घातल्यास अगर कोणत्या हि अन्य प्रकारें मला त्रास दिल्यास मी आपणांवर फौजदारी करीन. तुमचा मजबरोबर जर कांहीं तंटा असेल तर दिवाणी करून आपला हक्क शाबीत करून घ्यावा. आपल्या वर्तनामुळें जर मी खर्चांत आले तर ती सर्व नुकसानी तुम्हांकडून घेतली जाईल. कळावे ता. १६ माहे मे सन १९०२ इ.

सहीची निशानी.

सावित्री मर्द शिवराम अहीर

राहणार टिटवे प्रगणें पिंजर

हिचें हातची बांगडी.

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

…माही „ २ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ………………………६८

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस……… ०१ ०६
दुसरे खेपेस …. ……०१

REGISTERED

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Annual in arrears 7 „ 1 R…
Six monthly……… 3 ……………… 8 as
Single copy ……………………… 4 as

Advertisement
Below 10 lines …… 2 R.
Per line over 10 ……4 as
Repetition Per line…8 as

VOL XXXVI AKOLA MONDAY 26 MAY 1902 NO 20

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २६ माहे मे सन १९०२ इ० अंक २०


## खरेदी करा !

## रास्कोपचीं घेट व खरीं पेटंट वाचेस

## भकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रतीति तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीम सारी आमचे शिरावर आहे.

**सूचनाः**—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस……………………४०
१९ „ हंटिंग……………………५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ………१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे …………२५०

### मेटलचें तीन वर्षं ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह…………२०
१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ………………२१
१९ „ हाफ हंटिंगचें……………२०
१९ „ हंटिंगचें ……………………२०
१४ „ रिस्ट वॉच ……………………२०

### इनामल्मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओंपनफेस…………२०
१९ „ हंटिंग……………………२०
१४ „ रिस्टवॉच……………………२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच …………३०
१४ „ हंटिंग……………………३५
१८ व १९ „ ओपनफस…………३०
१९ „ सेकंद कांट्यासह …………३२
१९ „ मध्यमागीं सेकंद कांटा असलेलें ………………३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें….३५
१९ „ हंटिंग ………………… ४९

लेडीज वॉचेस १४, १८, क्यारट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

## सी. हॅनीगर आणि कंपनी,

ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.

५ हार्नबी रोड, मुंबई.

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## मोरोपंत

### निवडक वेचे.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

भारत स्त्रीपर्व अ. १

नगरीं सशोक संजय,
येउनि धृतराष्ट्र-राज-सदनातें
कळवी सविस्तर वृको–
दरकृत दुर्योधनोरु कदनातें १
धृतराष्ट्र पडे मूर्छित,
भासे त्या ताप तो न वांचविता
सोशिल शोक किति! सुत,
मेले अठरा दिसांत पांचविता २

( स्त्रियां सहवर्तमान राजा नगरा बाहेर गेला तों अश्वत्थामा, कृपाचार्य व भोज हे, रणांगणांतून, सर्वांचा संहार झाल्यावर, पळत येत असतां त्यास भेटले )

या अज्ञा पळतों कीं,
आम्हीं उरलों तिघेचि ते सत्र
येतिल वचितिल झालें.
सुतें प्रिय- पुत्र- पातनें तप्त २१
मनु नृगवतां भेटुनि,
राजाला; तिकडे तिघे झकले
त्यावरि सांपडला गुरु–सुत,
दोघ अपर्थान ते चुकले २३

अ. ४ ( धृतराष्ट्रानें स्त्रीजनांसह रणभूमींत प्रवेश केला, तेव्हां मृत वीरांच्या पत्नींची झालेली शोकाकुलता पुढील पद्यांत वर्णिली आहे. )

जे मक्षिले शिवेंहीं,
गृध्रांहीं, कृत-काय काकांहीं
ते पाहूनि न पाहति,
बहु मुल्य-मणींस बायका कांहीं ५
तें सर्व खें-चेष्टित,
गांधारी दिव्य दृष्टिनें पाहे
कृष्णासि म्हणे कोणी,
स्त्री ममजम दुःखिता जगीं आहे? ६
हुडकिती शवें पहा पति–
सुत, वळखायासि बायका सारीं
या कमळ-वन-विहारा,
शिरल्या हंसीच काय कासारीं ७
पदरें पुसांनि चुंबिति,
पतिमुख सुरतांत जें जसें चुंबी
बा! गतिकया प्रसवली,
जैशीं, ऐशीं न कटु फळें तुंबी १२
रडत नसें पुत्रातें,
स्वर्गा गेला न सोडिली संध्या
कृष्णा! रडतें मी या,
दीना हत-बांधवा धवा अंधा २१

१ भीमानें केलेलें. २ दुर्योधनाच्या मांड्यांचें कदन. ३ निद्रिस्त. ४ मुख्य नव्हेत. ५ कोल्हे. ६ सरोवर. ७ कडू भोपळी. ८ प्रतिज्ञा, ९ पतीला.

मुख हुंगती मुताचें,
पतिवर कर फिरविती पहावेना
कृष्णा कोणाचा तरि,
शोक करिल हें मला सहावेना २३
तापविती अति दुःसह,
पति सुत शोकार्त आंत बाहेर
विधिवरि बोटें मोडुनि,
कोपें खातात दांत बा ! हेर २६
मणि–कनक–प्रासादीं,
स्वर्गीं देवांगना तशा वसल्या
अश्व–रथ–प्रेत–गज–
छायेंत सुना अहा ! पहा बसल्या २७

( अभिमन्यु पत्नि उत्तरा इचा शोक. गांधारी श्री कृष्णास म्हणते. )

अंकीं मस्तक घेऊनि,
ती बाळा उत्तरा पहा पतितें
चिबुकें धरुनि बोलविते,
लिहिलें ऐसें कसें महापतितें ४१
म्हणते मौन त्यजुनि,
स्मितपूर्वक एक बोल बोला जी !
ती कसि निवेल तुमच्या,
प्रिय वागमृतींच निज लोलों जी ४२
हों जन सली समाजीं,
तुमचा सोडून काय पद रमला !
चुकलें क्षमा करावी,
पसराया उशिर काय पदर मला ४३
नसतां उशी उंशीर–
व्यसन, पयः फेन–शुभ्रें मृदु शयन
कशि निज आली ! जरि शिर,
न मदंकीं, पदतळींहि हा शयें न ४४
नेत्रें उघडूनि पहा,
दासी तुमचीच हे नव्हे अन्या
भलती स्पर्शेल कशी,
मी सत्य विराट नृपतिची कन्या ४६
हा सातवा परिचया,
मास, पहा गणुनि लोटले साच
इतुक्यांत कसे विटलां,
साधु म्हणति सख्य साधुशीं साच ४७
श्रीकृष्णजी ! तुम्हाला,
पाहुनि रचिला तुम्हा असानि गुणें
„
सुकुशल विधि परि पडले,
मुख्य प्रेमीं गुणींच फार उणें ५०
तुमवांचुनि वाचुनि सुख,
केंवं ! हा काय भार तार मला
ने; हंस मानसीं निज–
हंसीविण काय भरता रमला ! ५४

१ हनुवटि. २ हास्ययुक्त. ३ प्रिय असें जें वाचारूप अमृत याच्या ठायीं. ४ लव्य. ५ हा मी. आपले चरण क्षणभर सोडून मैत्रिणींच्या समाजांत गुंतून राहिलें असें वाटतें काय ? ६ बकयाचा पंखा. ७ फेसा सारिखी शुभ्र आणि मृदु शय्या. ८ माझ्या मांडीवर. ९ आपल्या चरण तळीं. १० हात माझा हात ( सेवेकरितां. ) ११ ब्रह्मदेव. १२ मानस सरोवरीं १३ हंसीस सोडून हंस रमला काय ?

बहु अप्सरा सुर-सुता,
आहेत मनोविनोद कुशला हो !
पाणी-ग्राह्यत्वातें,
तोहि जन उशीर होंहि कुशं लाहो १६
येइन कशि तरि सखया !,
पति पापांची न वाहुं दे शपथ
न विसंबेल पळ हि मन,
आणिक तव शोक पुसत देश पथ १७
आयातें दायातें,
...ण यें मज लाविली बळेंच सवे
...मं दितां तुझीच,
... आतां स्वपति वेगळें नसवे १८
पति जवळुनि कां नेतां !
नेउनि हितबंध करुनि खोलींत
तुमच्याहि असें अंतर,
पडलें कां गे क्रियेंत बोलींत १९

( कर्ण माता राधा इचा विलाप )

गी० ९

राधा म्हणत्ये हा ! मज,
पुत्रवतींचीच लागली दृष्टी
पुत्रा ! शून्या झाली,
तुजवांचुनि जेंवि रविविना सृष्टी ९
ब्रह्मण्य शूर दाता,
बुध सर्वांगोपभोग जो कर्ता
हर्ता शत्रूपद्रव,
दुष्ट नहि ! मारिला कसा मर्ता ११
मज तुजहि समाधि भजला,
उपभोगें तोषला विलासवती
अन्या, स्वर्गी नेणें,
त्यासि कसा दोष लाविला सवती १२
मज कां गिळिलें नाहीं,
पापे ! रथचक्र गे ! कसें गिळिलें
दे उत्तर एकोंदे,
कां न वदसि ? तोंड काय गे खिळिलें १३

× × × ×

( जयद्रथा विषयीं )

देवा ! जयद्रथाचें,
सांपडलें परि नसेचि धड धड तें
आलिंगिलें सुतेनें,
पाहुनि माझ्या उरांत धडधडतें १७
झाली पहा कसी बल-
वद्दें[10] मूढ सिंधुराज[11] गती
आश्रय देइल कशि मृग-
पारस्कर[12] मत्त सिंधुरीं[13] भगती[14] १८
कुंभीं[15] हारिली जेव्हां,
कृष्णा ! हा तेधवाचि मारावा
परि धर्म म्हणे बुडलें,
भगिनी सौभाग्य म्हणुनि तारावा १९
तेंसीच यीं[16] प्रसंगीं,
धर्में कां दुःशीला[17] न आठविली

---

१ मनाला आनंद देण्यास कुशल. २ वाळा. ३ मी. ४ तृण. ५ संपूर्ण अंग देशाचा उपभोग. ६ हे पृथ्वी ७ स्त्री. ८ शाबूत. ९ शरीर १० बलवानाशीं वैर केल्यानें. ११ जयद्रथ ( सिंध देशाचा राजा. ) १२ सिंहाचा अपराध करणाऱ्या १३ हत्तीला. १४ पृथ्वी. १५ द्रौपदीस जयद्रथानें पळविलें ( वनवासांत असतां ) तेव्हाच तो मारिला जावा १६ युद्ध प्रसंगीं. १७ दुर्योधन भगिनी, जयद्रथ पत्नि.

नाणो युद्धारंभीं,
करुणा तीर्थाऽटनासि पाठविशी २०
येती पुनः पुन्हा शिर,
हुडकुनि धांवत सुता धडाजवळ
कीं काक गृध्र वृक बक,
तड तड तोडूनि भक्षिती कवळ २२

वि. आ. का.

---

१ तीच. दुःशला. २ ग्रास.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती वैशाख वद्य ४ शके १८२४

---

## व्हिक्टोरिआ जयंती

गेली २४ व्यावी तारीख म्हणजे आपल्या पुण्य लोकवासी परमपूज्य भाग्यशाली चक्रवर्ती महाराणी व्हिक्टोरिआ साहेबांची जन्मतिथी होय. सामान्य जनांमध्यें आपल्या प्रिय माणसाची आठवण म्हणून त्याची पुण्यतिथी पाळण्याचा नेहमींचा संप्रदाय आहे. तसेंच पुण्यप्रतापी ईश्वरी अंशाचे जोरदार या मृत्युलोकींच्या वस्तींतील आपली इतिकर्तव्यता संपवून अक्षय्य सुख भोगण्यास गेले म्हणजे त्यांच्या गोड संस्मरणा निमित्त त्यांचा जयंती-उत्सव आपण करीत असतो. आपली व्हिक्टोरिआ आई म्हणजे केवळ श्रीदेवीचा प्रत्येक्ष अवतारच होता. आणि म्हणूनच त्यांच्या मागें त्यांची जयंती करण्याचा परिपाठ आपोआपच पडत आहे हें अगदीं यथार्थ आहे. मनुष्याचे सद्गुणच कायते त्याच्या मागें उरतात, कारण ते अविनाशी ब्रह्मस्वरूप होत. मृत्यूनें गुणी जन जरी दृष्टी आड केला तरी त्याचें सगुणरूप डोळ्या पुढून नाहींसें होत नाहीं. आज महाराणी साहेबास स्वर्गवासी होऊन वर्ष दीड वर्ष होत आलें, इतक्या काळांत अनेक लहान मोठ्या प्रसंगीं त्यांची ती आठवण होऊन त्यांच्या वियोग दुःखानें मन क्षणैक उद्विग्न व उदासीन होई. परंतु विशेषें करून या जयंतीच्या दिवशीं त्यांच्या एकेक गुणांची जी आठवण होते तीमुळें कालीन तुटतुटतें व दुःखावेगानें अंतःकरण सद्गदित होऊन जातें मृताबद्दलच्या दुःखांत एक अनिर्वाच्य अंतर्गत प्रेम भरलेलें असतें. सर्व दुःखें विसरण्या विषयीं आपण प्रयत्न करितो पण मेलेल्या बद्दल जें दुःख होतें तें मात्र आपण विसरून जावें असें कधींच इच्छित नाहींत व उलटें मृत्यूनें अंतः करणास पडलेली जखम बुजूं न देण्याचाच प्रयत्न करितो. एकदां जडलेलें प्रेम सदोदित जसेंच्या तसेंच राहतें हा मनुष्याच्या अंगचा मोठा अलौकिक गुण आहे. खरोखर पुण्यश्लोक महा साध्वी अशी महाराणी सारख्या स्त्रीस कोण विसरणार आहे? अहल्या द्रौपदी सारख्यांच्या नुसत्या नामस्मरणानें महापातकें नाश पावतात. व्हिक्टोरिया या गोड नामाचा तरी महिमा असाच विलक्षण आहे. त्यांच्या नांवानें आमच्या सारख्यांचीं अनंत महान् महान् दुःखें दूरावतील. त्यांचा आशीर्वाद व कृपाप्रसाद आम्हांवर परिपूर्ण आहे. ईश्वर त्यास अक्षय्य सुखांत ठेवो, व त्यांचें आम्हांस चिरकाल स्मरण राहो.

## आगमी महोत्सव

कालांतरानें दुःखद गोष्टी मागें पडून त्यांचा हळू हळू विसर पडत जातो. पुढील आशा कल्पनरूच्या आनंदमय शीतल छायेंत जाऊन बसण्याची मनाची धांव असते. व त्या सुफल आशातरूवरांच्या सुदर्शनांत मन रमून जातें. नित्य प्रेम हें गत गोष्टी जोडीत असतें, आणि सुखाशा ही पुढें आढीत नेते. आज पासून बरोबर एक महिनाच उरलेला आहे. आनंद सुमुहूर्ताच्या लग्न घटीकडे सर्वांचे डोळे लागलेले असतात. एक एक क्षण आपण मोजीत असतो. पुढील महिन्यांतच राजाधिराज एडवर्ड साहेबांच्या राज्याभिषेकाचा महोत्सव होणार आहे. एका राजानें आपला देह ठेविला कीं दुसरा त्याच्या स्थानीं संस्थापित होत असतो, व या रूढीपरंपरे प्रमाणें ह्या महोत्सवांत कांहीं विशेष आहे असें नाहीं. तरी आपल्या हिंदुस्थानच्या दृष्टीनें हा प्रसंग अती अपूर्वाईचाच होय. आज इंग्लंडचें राष्ट्र म्हणजे सर्व पृथ्वींत सुखवैभवाचें आदिपीठ आहे. अशा राष्ट्राच्या पादसेवनाचें एकनिष्ठ व्रत आपल्या हिंदुस्थान देशानें अंगिकारल्या पासून हा भावी महोत्सव प्रसंग फार विशेष महत्वाचाच आहे. इंग्रजी साम्राज्याच्या खुद्द राजनगरींतला हा उत्सव अप्रतीम होणार होणार हें निर्विवाद होय. अशा समयाच्या अवलोकनासाठीं देशोदेशीचे थोरथोर हजारों जन तिकडे लोटत आहेत. हा प्रसंग पाहून आपल्या डोळ्याचे सार्थक करावें म्हणून कोणाचें मन इंग्लंडाकडे जाणार नाहीं ? आमच्या हिंदुस्थानांतल्या कांहीं निवडक व बड्या लोकांसाठीं मुद्दाम अगत्याचीं निमंत्रणेंहि आपल्या बादशहांनीं पाठविलीं. हा जो त्यांनीं आपला बहुमान व गौरव केला त्या बद्दल आम्हांस मोठी धन्यता वाटते. त्यांच्या शद्वास मान देऊन आमच्या राष्ट्राच्या वतीनें बडेबडे राजे तिकडे जातात्हि आहेत. अशा प्रसंगास सर्वांस स्वतां जातां येणें हें अशक्य होय, तरी आमचें सर्व तनमनधन त्यांच्याच चरणीं अर्पण केलें आहे; व आम्ही केलेली सेवाहि ते मोठ्या मनोभावानें स्वीकारतात हें पाहून आम्हांस मोठा अभिमान वाटतो.

## गत गोष्टींची स्मृती

इंग्लंडांतील महोत्सवा प्रमाणें हिंदुस्थानांत म्हणून निराळा महोत्सव होणार आहे. पुढील इंग्रजी वर्षप्रतिपदेस चक्रवर्ती एडवर्ड साहेबांस हिंदुस्थानचे बादशहा म्हणून दिल्ली शहरीं तक्तनशीन करण्याचें ठरलें आहे. हा गोड प्रसंग आपल्या पैकीं पुष्कळांस पाहता येण्या सारखा आहे. हे सर्व आनंद प्रसंग निर्विघ्नपणें पार पडोत, आणि ईश्वर आपल्या महाराजास अखंड आयुष्य व सौख्य देवो !

हिंदुस्थानचें स्वराज्य हरपल्यापासून हा राज्यारोहणाचा प्रथमचाच प्रसंग होय. अशा आनंदी आनंदांतच मागील गोष्टींचें संस्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. भावी सौख्यांत गत गोष्टींची आठवण ही अवश्य होते आणि ह्या आठवणींत एक विशेषच गोडी असते. ही आठवणी दिल्ली दरबारचा प्रसंग पाहून तर फारच होईल. तेव्हां नाना कल्पनांनीं व विचारांनीं मन आतुर व व्याकूळ होऊन जाईल. दिल्लीची पूर्वीची राहशत व हल्लींची राहशत पाहून नष्ट वैभवाच्या स्मरणानें निराळ्याच चित्तवृत्ती उठतील व क्षणैक जिवाची कासाविशी होईल. परंतु कै. महाराणी साहेबांच्या आशीर्वचनानें आमचें कांहींच उणें पडणार नाहीं. व इंग्रजी साम्राज्याचें छत्र आम्हांस झालेल्या गोष्टींचा विसर पाडील व भावी आठवणाहि होऊं देणार नाहीं म्हणून मनास तात्पुरती समाधानी वाटेल.

## खऱ्यानीं व्यय

राष्ट्रीय सुखाचें दिग्दर्शन करण्याचे मार्ग फार निराळे आहेत. जेव्हां राष्ट्रास आनंद होतो तेव्हां त्या आनंद प्रदर्शना निमित्त त्याच सुमुहूर्तावर एखाद्या महत्कार्याचा प्रारंभ होतो. नुसत्या फाजील खर्चांत, चैन बाजींत किंवा ऐष आरामात संपत्तीचा विनियोग करीत नसतात. अशा रीतीनें पैसा खर्चणें हें रानवट राष्ट्राचेंच काम आहे. सुधारलेलीं राष्ट्रें कांहीं विशिष्ट कार्यारंभानेंच आ राष्ट्रीय आनंदांत भर घालीत असतात. राष्ट्रीय महोत्सवाचे प्रीत्यर्थ लाखो करोडो रुपये खर्च होतात पण त्यांच्या मुळें भावी कल्याण दायी सुखसंपदा लाभण्याचे राजमार्ग खुले झाले तरच ते सर्व पैसे सत्कार्यीं खर्च झाले म्हणून मनाप आल्हाद वाटतो. पैशाचा तरी हाच सद्व्यय होय. संपत्ती अनाठायीं खर्च करणें म्हणजे तिची किंमत न जाणतां तिचा अवमान करणें होय.

आनंदाचे प्रसंग श्रीमंतास व गरिबांस सारखेच आनंदवितात. आपआपल्या परीनें प्रत्येकजण आपल्या आनंदांत निमग्न असतो. आनंद दाखविण्याचीं साधनें अनंत आहेत व आपल्या पोटांतला आनंद कोणत्याहि रीतीनें दाखविला तरी ती आनंदकला कांहीं बदलत नाहीं आपल्या साधनसमुच्चयाच्या ऐपती प्रमाणें व सद्यःस्थितीस अनुरूप असा थाटमाट व वडीजाव प्रत्येकानें करावा. आनंदवेडाच्या भरांत आपल्या आवाक्या बाहेरचे कामास हात घालणें परिणामीं दुःख देतें हें विसरतां कामा नये. आपली अत्युत्कट राजनिष्ठा दर्शविण्यासाठीं दरिद्री प्रजाजनाचा पैसा पाण्या सारखा चैनींत ओतणें हें हिंदुस्थानांतील राजे रजवाड्यास व संस्थानिकांस शोभत नाहीं. ते राजनिष्ठेसाठीं व विशेष अगत्य म्हणून पुष्कळ पैका खर्चून विलायतेस जात आहेत ही गोष्ट कांहीं बातमी आहे असें नाहीं. पण हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीला असा पैसा खर्चणें अगदी चुकीचें आहे. राजनिष्ठा व प्रेम हीं पैशावर लुब्ध नाहींत. तीं अंतःकरणाच्या प्रेमळपणांतच निरंतर वास करितात.

आपल्या घरीं ईशकृपेनें एखादें मंगळ कार्य होत असलें तर त्यासाठीं आपले इष्ट मित्रांस आल्यानें आपण होऊन

आणितो, पण आमच्या चक्रवर्ती प्रभूंनीं आमच्या राजे रजवाड्यांस नुसती लोकोपचारासाठीं आमंत्रण चिठ्ठीच पाठविली आहे. ते आपल्या खर्चानें त्यांना विलायतेस नेत नाहींत. इंग्रज प्रभूंच्या आह्मी पासंगास तरी पुरणार आहों काय? त्यांची बरोबरी आह्मी कसे करूं शकणार? आह्मी त्यांचे, कितीहि झाले तरी गरिब दासच आहोत व ह्मणूनच ने राजे लोक आपल्या खर्चानें विलायतेस गेले त्यांचा पैसा अनाठायीं खर्च झाला असें आमचें मन सांगतें. अशा प्रसंगीं मानपत्राच्या प्रपणानें कार्यभाग झाला नसता असें वाटत नाहीं. शिवाय दिल्लीच्या दरबारचा प्रसंग कांहीं दूरवर राहिला नाहीं. याच्या प्रीत्यर्थहि आमच शेंकडोंशें रुपये खर्च होत आहेत. असा पुन्हां निराळ्या दरबाराचा अट्टहास माडण्याचें विशेष प्रयोजन होतें असें नाहीं. या पेक्षां लोक कल्याणाच्या विशिष्ट गोष्टीकडे हा व्यय झाला असतां तर अत्युत्तम गोष्ट झाली असती. असो ज्या अर्थी राजकार्यकुशल व थोर महात्म्यांनीं ही गोष्ट करण्याचें ठरविलें आहे त्या अर्थी त्यापासून कांहीं अलभ्य लाभच प्राप्त होईल अशी फार आशा वाटते. होत असलेल्या गोष्टीपासून आमच्या हिंदुस्थानचें दारिद्य हरो, आमच्या अंगीं कांहीं पुरुषार्थ येवो आणि आमचें इंग्रजी साम्राज्य सुखानें चिरकाल नांदो हीच परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

---

पुढील सालीं राज्यारोहणा निमित्त आपल्या हिंदुस्थानचा निराळा ह्मणून राष्ट्रीय महोत्सव होणार आहे त्या अर्थीं पुढील महिन्यांत इंग्लंडास जो उत्सव होणार आहे तन्निमित्त आपण विशेष कांहीं केलें नाहीं तरी हरकत नाहीं. आपल्या उत्सवाचा सर्व भर दिल्ली दरबारच्या वेळीं झाला पाहिजे असें हिंदुस्थान सरकारचें सर्वांस कळविणें आहे. हिंदुस्थान सरकारनें ही गोष्ट मनावर घेतली आहे त्या अर्थीं हा उत्सव इंग्लंडांतील महोत्सवापेक्षांहि सरस होईल अशी आमची खात्री आहे. असले प्रसंग ह्मणजे राष्ट्रांतील सर्व लोकांचीं मनें अचानक ईश्वरी करणीनें एक बनून तल्लीन करतात. यावेळीं सर्व लोक आनंदाची कडेलोट करून आपल्या भक्तीभावानें जगतास थक्क करून सोडतील यांत शंका नाहीं.

पुढील जून महिन्यांतील आनंदासाठीं हिंदुस्थानच्या सर्व लोकांनीं आपल्या आवडी प्रमाणें एक एक वृक्ष लावून तो चांगल्या नांवारूपास येईल अशी योजना करावी अशी एका गृहस्थाची सूचना आहे. ही सूचना खरोखरीच चांगली, व सोपी आहे. आणि सर्व पुढारी लोकांनीं या गोष्टींत थोडीशी उचल केल्यास ही सुसाध्य होईल ह्मणून तसें करण्याबद्दल आह्मी सर्वांस मुद्दाम विनंती करितों.

---

## निराशा नको

वेस्ट इंडिज बेटांतील लोकांवर ईश्वरी क्षोभाचा कडेलोट झाला यांत शंका नाहीं. एका निमिष मात्राच्या अवधींत चाळीस पन्नास हजार लोकांची ज्वालामुखी पर्वतांच्या अग्निकुंडांत आहुती पडावी व धरणी कंपानें सर्वांचा एकदम स्वाहाकार व्हावा ही गोष्ट मोठी हृदयद्रावक आहे. भूकंपाच्या व ज्वाला मुखींच्या गोष्टी अशा भयानक व अचंब्याच्या घडतात हें गहशूर आहे. अशा गोष्टी ऐकिल्या ह्मणजे ईश्वराच्या अगम्य कृती बद्दल मन थक्क होऊन जातें जे प्राणी अस अवकाळीं मृत्युमुखीं पडतात तेच खरोखरी दुर्दैवी होत. आपल्या हिंदुस्थान देशांत दुःखपरंपरा कांहीं कमी आहे असें नाहीं. त्याच्या अंतस्थ दुःखांची गोळा बेरीज पाहिली ह्मणजे मन फार निराश होतें. व हाच देश सर्व दुःखदुःखाचें आयतन उत्पन्न केलें आहे असा भास होतो. आपला देश दुःखी होण्याच्या वेळीं सुद्धां कपाळकरंटा व दुर्दैवी होय असे पुष्कळांचे उद्गार बाहेर पेतात, पण आपण असे निराशाचे शब्द तोंडा बाहेर काढतो हें चुकीचें आहे. आपल्या लोकांची वेस्टइंडीजच्या लोकासारखी एका पळांत राखरांगोळी होऊन, पूर्वी कधीं होतें का नव्हते, अशी स्थिती कधीं झाली नाहीं ही सुदैवाची गोष्ट नव्हे काय? आपलें दुःख गतकालाची व भविष्यकालाची, कालत्रयीं न तुटणारी अशी दृढ सांखळी तयार करीत आहे. आपल्या आशावृक्षाच्या अंकुराची जरी वरवर रूखी होते तरी तो महावृक्ष मुळापासून उन्मूल पडून जळून जात नाहीं, त्याला कोमल नूतन अंकूर फुटण्याची त्याची शक्ति कमती होत नाहीं, व तो आज नाहीं तरी उद्या सुफलित होईल अशी गोडबोली आशा आपणांस सांगत आहे हें आपण पूर्ण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. आपणांवर जीं दुःखें ईश्वर धाडीत आहे तीं आपला नायनाट व संहार करण्यासाठीं नव्हे तर आपल्या अंगचें सामर्थ्य वाढावें व आपला हिय्या जोरदार व्हावा असाच याचा संकेत आहे. हीं दुःखें नव्हत तर तीं पुढील सौख्यभूमीचा अंतर्गत जोलपाया होत. आपण कपाळकरंटे नाहीं आहोंत अशी पक्की गांठ मनात बांधा. आपल्या सारखा ईश्वरी प्रसाद दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रावर नाहीं व आपण त्याच्या अगदी मर्जीतले आहोंत असा आपल्या मनाशीं तुह्मी अनुभव पहा. आपण निराशेचा जड वारा अंगांत भरूं देतां कामा नये. आपण आपल्या उन्नती साठीं पर्वतप्राय उद्योगाच्या राशींच्या राशी पाडल्या पाहिजेत, आपण सुदैवीच आहोत पण तुमच्या मनांत कांहीं किंतु असेल तर तुह्मी सदैव त्या परमेश्वरास भोळ्या प्रेमानें आळवीत जा. तो दयासागर व दीनबंधू आहे व तो आपलें ब्रीद कधींहि सांडणार नाहीं ही खात्री ठेवा. आपल्या आशेचा अंत नाहीं व ती कधींहि नाहींशी होणार नाहीं असा पुरा संकल्प करून उल्हास वृत्तीनें आपण कार्य करीत गेलों ह्मणजे सर्व दुःख समुद्र आटून जातील व ईश्वरी प्रसादाचा वर्षाव होईल यांत काडी इतकें अंतर पडणार नाहीं. क्षणिक निराशेमुळें आपल्या उद्योगांत खळ पडूं देऊं नका हेंच वारंवार सांगणें आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY MAY 26 1902

We feel much mortified at the indifferent treatment we receive at the hands of our sovereign rulers. We feel much pained at their disdainful look in every line of life. We are not insensible to the fact that they are conquerors and we the vanquished. But it is their noble task and pricipal duty to sink deep down this ignoble difference which touches our hearts to the quick. We feel idignant so to say to have to put up with such mortification when they deal with us at an arm's length. There is not a matter that does not savour of a ruler's pride and high handedness. We are a fallen people and we have neither the voice in our re—presentative bodies nor any hand in the administration of our own affairs. We are merely tools for their greatness and pleasure. Theirs and ours seem the interests most divergently different. But such a divided state of things cannot possibly establish the most cherished object of the British sovereignty over the whole world. Such a noble ideal for its accomplishment must develop a spirit of rare self—sacrifice and foster tender feelings of brotherly love and sympathy. It is yet wanting in the most powerful cement of uniting hearts and interests.

We are happy indeed in being brought into close contact with the English nation. We do differ from the English in caste, creed and colour; our customs and manners are not the same as theirs. But with all these differences there is one potent factor that alone can bridge over these differences. Both of us are under the one political power that can put aside these seemingly mighty forces. The present times are most favourable for such a power to assert its existence. The time for the coming coronation is fast approaching. It is a commemoration of a great event of joy and joy is the one great touch of nature that removes all differences. We all unite under the begeign British flag to welcome our great sovereign on the English throne and hope to see a new and properous era in no distant future.

We hope that the ooronation marks the beginning of a hopeful era for India. All her past defeats in the tremendous task of her upheaval will be soon balanced by munificent grants of rights and liberties she would receive. It is a turning point in the transition of this nation's life. India would no longer be treated by England as a rival but her equal. She would play no small part in the making of the world's progress. Her presence is sufficient to charge the course of history. It would be an unparallel triumph of the English nation to have within its power to wield such a mighty force for the good of humanity. But such a dream is possible only when our English brethren from the heart of their hearts condescend to walk with us hand in hand. Such a brotherly affection can make up the past grievanses on mutual sides. Without affectionate feelings there can be no other binding of hearts and hearts. And without such a bond nothing can help to put to—gether the hetrogeneous elements in the nation into a harmoneous whole. Such a harmoneous unification is the essence of a nation's life and existence, and it is given to very few to achieve this unique success. It is a work of years and years: it is a conquest not of mere lands but of unfathomable minds of men. Consummation of such a union of England and India is awaiting the near future. Fusion of the two races is almost an accomplished fact if our rulers really mean to have it so. On our own part we are ready to shake hands with our rulers; we only ask them to give their hands in return.

---

## वऱ्हाड

हवामान— दिवसा ऊन फार प्रखर पडतें, तरी रात्रौ थंडावा लवकर येतो. पहाटेस वरा सोसाट्याचा वाहतो. सार्वजनिक आरोग्य बरें आहे.

सूर्याच्या प्रखर तापामुळें येथील हवा बरीच स्वच्छ आहे, तरी म्यु० कमेटीची शहर सफाईकडे बरीच उणीव दिसते. पाण्याचे हाल फार होतात. गटारें साफ होत नसल्यामुळें फार दुर्गंधी चालते. याचा बंदोबस्त वेळींच होईल तर फार बरें नव्हे काय?

आह्मांस लिहिण्यास वाईट वाटतें कीं रा० रा० वासुदेव व परांजपे उमरावती डेपुटी कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट यांस गेल्या शुक्रवारीं देवाज्ञा झाली.

रा० रा० नारायण चिंतामण भट डाक्टर यांस ही उमरावती मुक्कामीं देवाज्ञा झाली ही गोष्ट वाईट झाली. हे गृहस्थही पूर्वी आकोल्यास पुष्कळ दिवस होते व त्यांचा परिचय येथें पुष्कळांशीं आहे. यांनीं स्वतांचा पुनर्विवाह केला होता व आपल्या बहिणीचाहि पुनर्विवाह करून दिला होता हे विशेष होय. यांच्या मरणानें वऱ्हाडांतील एक खरा सुधारक नाहींसा झाला. हे मोठ उद्योगी व बाणेदार गृहस्थ होते.

---


नोटीस

बेशमी बनसी वल्लद सखाराम कुणबी राहणार बाळापूर यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळविते कीं, मी तमची लग्नाची स्त्री आहे, पण आपणाकडून माझे पोट भरत नसल्यामुळें सुमारें दोन वर्षापूर्वी आपण रागावून त्रासून, व मारठोक करून घालवून दिलें. मी चार कष्ट करून व कर्ज काढून पोट भरतें पण आतां असे दिवस काढवत नाहींत. ह्मणून कळविते कीं, आपण चार दिवसांत माझे घरीं येऊन मला घेऊन जावें व माझ्या जिवामास धक्का लागणार नाहीं अशी चार पंचाची खात्री करून द्यावी. वागविणें नसल्यास फारकती द्यावी, व दोन वर्षाच्या पोटगी बद्दल शंभर रुपये द्यावेत. असें मुदतींत न कराल तर हीच नोटीस फारकत समजून दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर कोणचाहि हक्क राहणार नाहीं. व पोटगीचे सरकारांत फिर्याद करून खर्चासह पैसे घेईन. ह्मणून मुद्दाम अगाऊ जाहीर नोटिशीनें कळविलें आहे. कळावें तारीख २३ मे १९०२ इ.

सहीची निशाणी

सारजी मर्द बनसी राहणार बाळापूर हिचे हातची बांगडी


---

## वर्तमानसार

फोनोग्राफची साक्ष— न्यूझरवी इलाख्यांतील [illegible] मुक्कामीं एका गृहस्थाचा कुत्रा रात्रभर ओरडून शेजारीपाजारी लोकांस अतिशय त्रास देत होता. शेवटीं लोकांनीं या कुत्र्याच्या मालकावर फिर्याद केली. त्या ओरडण्यापासून आपणास कसा रीतीचा त्रास होत होता याचा पुरावा करण्याकरितां त्या कुत्र्याचें त्रासदायक ओरडणें फोनाग्राफनें घेऊन तें फोनोग्राफ कोर्टांत आणून त्याच्या योगानें त्याचें ओरडणें ओरडून दाखविलें.

उंच मनुष्य— एडवर्ड ब्यूपर नांवाचा २० वर्षांच्या वयाचा एक फ्रान्स देशांतून जाऊन कनाडा देशांत राहणारा मनुष्य जगांतील सर्व माणसापेक्षां उंच व वजनदार आहे. त्याची उंची १० फूट ११ इंच व वजन ९८७ पौंड आहे.

जन्मेजयाचा सर्पयज्ञ— आग्रा प्रांतांत मैनापुरी नांवाच्या जिल्ह्यामध्यें जन्मेजयाचें सर्पकुंड निघालें आहे. कुंड औरस चौरस १९ बिघे आहे. हें कुंड खणते वेळीं यांत सर्पांचीं हाडें, भस्म, कोळसा, सुपारी, तीळ, चामर वगैरे याज्ञिक जिन्नस सांपडलें आहेत.

तोतरेपणा जाण्यास उपाय— तोतरेपणा जाण्यास पुढील प्रमाणें एक सुलभ उपाय नुकताच योजण्यांत आला आहे. जो तोतर असेल त्याला दहा दिवस अगदींच बोलूं देत नाहींत, या मुळें त्याच्या आवाजास विसावा मिळतो, नंतर पुढच्या दहा दिवसांत त्याला कुजबुजण्यास मात्र सांगतात, नंतर त्यास पुढें हळू हळू मोठ्यानें बोलण्यास परवानगी देतात, व असें केल्यानें तोतरेपणा जातो असें ह्मणतात. करून पहावें, व अनुभव कळवावा.

नवी युक्ति— आस्ट्रिया देशांतील व्हियेना शहरचे डाक्टर गरसुंझ यांनीं कापलेलें [illegible] चिरलेलें नाक पूर्वीसारखें दुरुस्त करण्याची युक्ति काढली आहे ही साधी असून [illegible] दुःख किंवा इजा होत नाहीं. [illegible] नामक द्रव्य लावून नाकाचें कातडें [illegible] करितात. नंतर मेण व व्हासेलिन [illegible] तें मिश्रण एका पिचकारीनें त्या [illegible] तडींखालीं घालून मग बोटानें चेंपून [illegible] पाहिजे तसा आकार आणितात. पुढें [illegible] निघून जातें व मेण, शिरा व [illegible] मिळून जाऊन नाक कायमचें [illegible] ते. या ठिकाणीं थोडी चुणचुण [illegible] ती लवकरच नाहींशी होते. [illegible] दूर करण्याच्या कामींही या युक्तीचा उपयोग करितां येतो. जखम किंवा फोड यांच्या योगानें पडलेले पांढरे डागही या मिश्रणांत थोडा रंग घालून, तें मिश्रण घातल्यानें नाहींसे होतात.

पहेलवानांची मोठी दंगल— तारीख २, ३, व ४ जुलई या तीन दिवशीं इंदोर शहरांत हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या पहेलवानांची दंगल होणार आहे. शु० सू०

कोण अमानुष क्रूरता!— अमेरिकन लोकांची फिलिपाईन लोकांशीं जी नुकतीच लढाई सुरू झाली आहे तीमध्यें एकानें फिलिपाईन लोकांस नुसतें मांस खावयास देऊन त्यावर ४८ तास पर्यंत त्यास पाणी प्यावयास न देतां यमसदनास पाठविलें, दुसऱ्यानें त्याच लोकांचीं पाण्यानें गच्च भरलेलीं पोटें दोरीनें आवळून त्यांचा प्राण घेतला, तिसऱ्यानें दहा वर्षांच्या पोरापर्यंत कत्तल करण्याचा मानव जातीस न शोभणारा व जगाच्या इतिहासांत कोठेंही न दिसणारा हुकूम सोडला.

डीवेटबाई—'लढाई लवकरच संपेल असें तुह्मास वाटतें; तशी संपेल कदाचित्. पण, आमची हल्लींचीं लहान मुलें मोठीं झालीं ह्मणजे आणखीं २० वर्षांनीं इंग्रजांशीं दुसरा सामना होईल, हें पक्कें लक्षांत ठेवा." कोण हा पीळ.

दीर्घोद्योग— अमेरिकामधील एक बडे गृहस्थ हल्लीं मुंगुसें जमा करीत आहेत. यांचा उद्देश असा आहे कीं, शेतांतले उंदीर नाहींसे करण्याचें कंट्राक्ट घेण्याचें आहे! याचें नांव कल्पना ऊर्फ डोकें.

सोमवल्ली—या वनस्पतीस सोम असें नांव देण्याचें कारण हिला चंद्रानमाणें वृद्धिक्षय आहेत. ह्मणजे शुक्ल प्रतिपदेस हिला एक पान येतें व द्वितीयेस दोन, तृतीयेस तीन, या प्रमाणें पौर्णिमेपर्यंत हिला पंधरा पानें येतात, आणि पुढें कृष्ण प्रतिपदेस चौदा, द्वितीयेस तेरा, असें होताहोतां अमावास्येपर्यंत क्रमानें सगळीं पानें झडतात, असा नेहमींचा क्रम असतो. हिचे वेल असून तिला कंद असतो व त्या कंदापासून चीक निघतो.

मनुष्याला वार्धक्यपणें हा स्वभाविक धर्म आहे, तथापि सोमवल्लीच्या सेवनापासून दहा हजार वर्षेंपर्यंत सुद्धां जरा, व्याधि वगैरे न होतां तो अमर राहील ह्मणतात. ही दिव्य वनस्पती शोधून काढल्यास फारच मजा होईल.

---

नोटिशीचें उत्तर

सजन मर्द गणू फाटकर कुणबी राहणार मुंडगांव ता. आकोट ह्यांस:-

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, तुह्मी तारीख १ माहे मे सन १९०२ इसवीच्या 'शुद्धवऱ्हाडी' पत्रांतून नोटीस दिली ती पावली. आपण नोटिशींत लिहिलेल्या सर्व गोष्टी खोट्या व लबाडीच्या आहेत. आमचे हिस्सेवांटे झाले आहेत व आह्मांस तुमच्या शेतामातांशीं, घरदारांशीं, व इतर चीजवस्तूंशीं कांहीं कर्तव्य नाहीं. तुमच्या मुलाचा व आमचा अर्थाअर्थीं कांहीं संबंधहि उरलेला नाहीं. तुह्मी विनाकारण मजवर नोटीस देऊन मला उगीच त्रासांत व ६-७ रुपयांच्या खर्चांत मात्र आणिलें आहे. तो खर्च माझा मला आणून देऊन चुकती पावती घ्यावी. असें चार दिवसांत न कराल आणि उलटी मजवर फिर्याद अर्याद करून मला खर्चांत पाडाल तर त्याज बदलची सर्व तऱ्हेची नुकसानी तुह्मांपासून भरून घेईन. ह्मणून मुद्दाम जाहीर रीतीनें कळविलें आहे. या उप्पर आपल्या मर्जीस येईल तें करावें. कळावें तारीख २० माहे मे सन १९०२ इ.

सहीची निशाणी
परशराम वल्लद हंबीरजी फाटकर
कुणबी राहणार सोनबर्डी ता.
व पोस्ट आकोट-याच्या
हातचा वखर.

नोटीस.

गुलजार आलीशा वल्लद आजगर आलीशा फकीर राहणार कसबे धामनी तालुके मंगरूळपीर जिल्हा वाशीम. यांस.

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मास मी कुलमुखत्यारपत्र देऊन रजिष्टर करून दिलें आहे त्यास दीड १॥ वर्ष झालें आहे. त्या दिवसापासून तुह्मी माझें काम कांहींच केलें नाहीं व दिवाणींत दावाही केला नाहीं. करितां तुमचें मुखत्यारपत्र मी रद्द केलें आहे. तर तुह्मी माझें मुखत्यारपत्र मजला परत करावें, कळावें ता. १७ मे १९०२ इसवी,

सही.

सहीची निशाणी रेसमाई मर्द सोनाजी
धनगर राहणार कसबे धामनी
ता. मंगरूळपीर इची बांगडी
दस्तुर जैवंत रामराव.

---

जाहिरनामा.

सर्वत्र लोकांस कळावें कीं, गुलजार आलीशा वल्लद आजगर आलीशा फकीर राहणार कसबे धामनी तालुके मंगरूळपीर जिल्हा वाशीम याजला मी कुलमुखत्यारपत्र दिलें होतें ते रद्द केलें आहे. माझ्या संबंधानें त्याशीं कोणी देवघेव करूं नये. केल्यास मी जबाबदार नाहीं, कळावें. तारीख १७ मे १९०२ इसवी.

सही.

सहीची निशानी बांगडी रेसमाई
मर्द सोनाजी धनगर राहणार
कसबे धामनी ता. मंगरूळपीर
दस्तुर जैवंत रामराव.

---

नोटीस.

नोटीस बेशमी गुलाम हबीब वल्लद बन्नू मिया देशमुख हल्लीं वस्ती लोहार तालुके बाळापूर पोस्ट शेगांव यास:—

मी खालीं सही करणार नोटीस देतों कीं मौजे लोहार येथील शेत आलूरकाचें याचे खातें शाहामिया यांचें नांवानी असोन यातील निमे हिस्सा माझे मालकीचा मी तुह्मास दुष्काळचे सालीं पैशाचे अडचणीमुळें पट्ट्यानें दिला होता व त्यांत अशी शर्त होती कीं ज्या वेळीं आह्मी रुपये देऊं त्या वेळीं तुह्मी शेत आह्मास परत द्यावें. तुमचे रुपयास व्याज नाहीं व पीक व्याजा मध्यें खावें. त्या प्रमाणें मी रुपये घेऊन दोन तीन वेळा आलो असतां रुपये तुह्मी घेतले नाहींत. करितां ही नोटीस देण्यांत येते कीं रुपये तुमचे तुह्मी घेऊन शेत आमचे ताब्यांत द्यावें. रुपये रा. विठोबा वल्लद महादाजी बकाल याचे येथें धरवर पडले आहेत. आठ दिवसाचे आंत रुपये घेऊन पावती द्यावी. तसे न केल्यास तुमचेवर योग्य कोर्टांत दावा करून शेत ताब्यांत घेतलें जाईल व सर्व खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें. ता. २०।५।१९०२ इ.

सही
अबदूल रहिमान वल्लद शेख नन्नु
देशमुख रा. लोहार द. खु.

नोटीस

बेशमी रंज्या भटाल माळी राहणार आकोली खुर्द पोस्ट—आकोला यांस:—

मी या लेखानें कळवितो कीं, तुमचे खातणाचें आकोली यथील शेत तुह्मी मला २२० रुपयांत विकत देण्याचा करार केला व हा सवदा नक्की ठरला ह्मणून २ रुपये इसारहि मजपासून तुह्मी घेतला. त्यास आज ५-६ महिने लोटले, मी पैसे देण्यास तयार आहे तरी अद्याप खरेदीखत तुह्मी करून देत नाहीं तुह्मांस जास्त पैशाचा लोभ सुटलासा दिसतो असो. आठ दिवसांच्या आंत आपले पैसे घेऊन खरेदीखत करून द्यावें. असें न केल्यास कोर्ट मार्फत तजवीज करावी लागेल व सर्व खर्च व नुकसानी तुह्मांस भरून द्यावी लागेल. कळावें ता. २१ मे १९०२ इसवी. सही

शेख फत्तू वल्लद शेख कादर
बकर कसाई वस्ती आकोला
निशाणी खुद्द.

---

जाहिरात.

खालील जिन्नस उत्तम प्रकारचे असून ते योग्य किंमतीला आपल्या दुकानीं विकत मिळतील सर्व माल खात्री लायक आहे,

पेयें

| | दर डझनास. |
|---|---|
| सोडा वाटर मोठी बाटली | ६ आणे |
| ,, लहान बाटली | ३ आणे |
| लेमोनेड मोठी बाटली | ९ आणे |
| लेमोनेड लहान बाटली | ६ आणे |

जीन

जिना संबंधी लागणारे सामान भीन, बोल्ट, नट इत्यादि सर्व विक्रीस तयार आहे.

तेलें.

१ जिनींग आईल. १ सिलींडर आईल
१ खोबरेल तेल. १ केरोसीन तेल.

पट्टे

चामड्याचे पट्टे ३ इंची, १ ½ इंची, चामड्याची बारीक वादी.

चीनी काम.

प्याला रकाबी वगैरे.
एल्युमीनमचीं भांडीं.
गाडीची वगैरे चरबी,

रंग

व्हाईट लेड
व्हाईट झींक
ग्रीन सीस मीनरल
ब्राऊन पेन्ट
टरपेन टाईन वगैरे.

धनजीशा मोटाभाई दारूखानवाला
आणि कंपनी आकोला.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.